**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष बन्सी खाडे
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, रानीचा बाग, पुणे- ४११ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर अधिकारी,
आदिवासी विकास, ठाणे, वरदान संकुल,
९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६, ठाणे (प)- ४०० ६०४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
आदिवासी विकास, ठाणे, वरदान संकुल,
९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६, ठाणे (प)- ४०० ६०४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुभाष बन्सी खाडे
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, रानीचा बाग, पुणे- १

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
आदिवासी विकास, ठाणे, वरदान संकुल,
९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६, ठाणे (प) श्री. मुस्ताक अब्दुलगनी शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - श्री. जे. व्ही.अवचट, उपलेखापाल, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई हे २४ वर्षे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयात पुण्यातच कामाला होते. त्याना दोन आगाऊ वेतनवाढी देऊन तात्पुरत्या बदलीने दोन दिवस पदोन्नती दिली व बदलीच्या जागी ते हजर झाल्यानंतर नियमबाहयरीत्या पुन्हा पुणे येथील कार्यालयात पर्यायी व्यवस्था म्हणून पदस्थापना केली. या सर्व गैरप्रकाराच्या अनुषंगाने स्पष्ट माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. १०/६/२०१० च्या अर्जाला दि. ३०/६/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. उत्तर मोघम असल्याच्या कारणावरुन त्यानी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. श्री. अवचट यांच्या बाबत पर्यायी व्यवस्था ही कायम स्वरुपाची नसून तात्पुरत्या स्वरुपाची आहे, असे अपिलीय प्राधिकारी यानी त्यावेळी स्पष्ट केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली असून श्री. अवचट यांच्या पदस्थापनेबाबतची त्यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र श्री. अवचट याना देण्यात येणारे वेतन/भत्ते या बाबतचा तपशील ३ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी दि. ११/४/२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास त्याची प्रत पुरविणे अपेक्षित आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.चंद्रकांत भाऊ सोनवणे
फ्लॅट नं.११, यश अपार्टमेंट,
कदम प्लाझा, भारती विद्यापीठ समोर,
कात्रज, पुणे-४११ ०४६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
पूना कॉलेज ऑफ फार्मसी,
भारती विद्यापीठ एज्युकेशन कॉम्प्लेक्स, एरंडवणा,
पौड रोड, पुणे-४११ ०३८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पूना कॉलेज ऑफ फार्मसी,
भारती विद्यापीठ एज्युकेशन कॉम्प्लेक्स, एरंडवणा,
पौड रोड, पुणे-४११ ०३८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.८.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.चंद्रकांत भाऊ सोनवणे<br>फ्लॅट नं.११, यश अपार्टमेंट,<br>कदम प्लाझा, भारती विद्यापीठ समोर,<br>कात्रज, पुणे-४११ ०४६ | |

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी,**<br>पूना कॉलेज ऑफ फार्मसी,<br>भारती विद्यापीठ एज्युकेशन कॉम्प्लेक्स, एरंडवणा,<br>पौड रोड, पुणे-४११ ०३८<br>डॉ.जान्हवी रामचंद्र राव |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बी.फार्म. या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २००४-२००५ मधील शिक्षण व अन्य शुल्क परत मिळणेबाबत |

**विवेचन**

'पूना कॉलेज ऑफ फार्मसी' या महाविद्यालयाकडे भरण्यात आलेली अनामत रक्कम रु.५००/- मला दि.११.७.२००९ रोजी मिळाली असून ऊर्वरित रक्कम रु.८०००/- प्राचार्य, पूना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे यानी मला दि.२०.८.२०११ रोजी रोख स्वरुपात दिलेली आहे. सर्व रकमा मला मिळालेल्या असल्याने माझी कोणतीही तक्रार नाही, तरी माझे अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.चंद्रकांत भाऊ सोनवणे यानी आयोगास सादर केले. अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच प्रशासकीय कार्यवाहीही करण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 22 AUG 2011**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. तानाजी शंकर साळुंखे
चालक क्र. २७४४, नवीन वसाहत,
शिवाजीनगर, वासूद रोड, मु. पो. ता. सांगोला, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभाग, सोलापूर, जि. सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार प्रमुख क,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तानाजी शंकर साळुंखे
चालक क्र. २७४४, नवीन वसाहत,
शिवाजीनगर, वासूद रोड, मु. पो. ता. सांगोला, जि. सोलापूर

**अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी** ॲडव्होकेट बी. जी. होळकर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभाग, सोलापूर,
जि. सोलापूर श्री. धनाजीराव रंगराव थोरात

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- कार्यालयाने केलेल्या वाटपानुसार चालकांनी केलेली कामे/ गैरहजेरी/ चालकांवरील दोषारोप व त्याबाबतची कार्यवाही या विषयीची माहिती जन माहिती अधिका-यांनी चुकीची दिली. म्हणून विभाग नियंत्रकाकडे अपील केले. परंतु त्यानी अन्यायाचे निवारण केले नाही व मागणी बाबतचा निर्णयही दिला नाही. त्यामुळे आगार व्यवस्थापक श्री. एस. एस. पळसुले त्रास देत आहेत.

अपिलीय प्राधिकारी - श्री. साळुंखे यांचा अर्ज दि. १२/१/२०१० रोजी प्राप्त झाला. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १०/२/२०१० च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. दि. १३/२/२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली. मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ बाबत मिळालेली माहिती अपुरी असून आणखी तपशील हवा असल्याचे श्री. साळुंखे यानी प्रथम अपिलाच्या दरम्यान सांगितले. त्यानुसार त्यांचे शंकानिरसन करुन माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी याना आदेश दिले. माहिती घेऊन जाण्याबाबत सूचना देऊनही अपीलकर्ता माहिती घेण्यासाठी जात नाहीत.

अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख क, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. एस. एस. पळसुले यानी तयार केलेली माहिती अपीलकर्त्यास ३ दिवसांत टपालाने पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :-१८.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.विवेक विष्णुपंत कुलकर्णी
अगस्ती, प्लॉट नं.३, साने गुरूजी हौसिंग सोसायटी, धामणी रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, नाजकधा-३,
नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२ / २०११ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** ॲड.विवेक विष्णुपंत कुलकर्णी<br>अगस्ती, प्लॉट नं.३, साने गुरूजी हौसिंग सोसायटी, धामणी रोड, सांगली<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, नाजकधा-३, नगरविकास विभाग,<br>मंत्रालय, मुंबई श्री.अरविंद विठ्ठलराव पवार | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : सांगली नागरी जमीन कमाल धारणा समूहाच्या क्षेत्रातील नागरी जमीन कमाल धारणेच्या अनुषंगाने शासनाने घेतलेल्या दि.२१.८.१९९६ च्या निर्णयासंबंधातील कागदपत्रांच्या प्रती व मूळ मालकाला जमिनी परत देण्याच्या संदर्भातील निर्णयाबाबतची माहिती गृहनिर्माण विभाग, महसूल व

वनविभाग व नागरी विकास विभाग यांच्याकडे मागितली होती. परंतु अन्य विभागांनी अर्ज नगरविकास विभागाकडेच वर्ग केले व नस्ती क्र.यूएलसी-१०८९/२१२३-नाजकधा-२ या कार्यालयाच्या अभिलेखात आढळून येत नाही, असे नगरविकास विभागाने कळविले. वस्तुतः कायमस्वरूपी जतनाची अशी ही कागदपत्रे असून गैरप्रकार उघड होऊ नयेत म्हणूनच ती दिली जात नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी मागितलेले अभिलेख कायमस्वरूपी जतनाचे आहेत. विविध विभागांमध्ये शोध घेऊनही सबंधित नस्ती उपलब्ध होत नाही. तसेच सन १९८६ ची प्रकरण नोंदवही ठेवलेली आढळून येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी सन १९८६ मधील निर्णयासंबंधातील कागदपत्रांची मागणी केली असून हे अभिलेख कायमस्वरूपी जतनाचे आहेत. नागरी जमीन कमाल धारणेसारख्या महत्त्वाच्या विषयातील ही कागदपत्रे सार्वजनिक हिताच्या दृष्टीनेही महत्त्वाची व म्हणून वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ नुसार शासनाने स्वयंस्फूर्तीने सार्वजनिकरीत्या उपलब्ध ठेवणे आवश्यक अशा स्वरूपाची आहेत. तरीही ही कागदपत्रे अथवा त्या संदर्भातील नोंदी उपलब्ध होत नाहीत, ही बाब गंभीर आहेत. महत्त्वाच्या शासकीय निर्णयाबाबतची माहिती नागरिकांना नाकारणे असा त्याचा अर्थ होतो. म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी या अभिलेखाचा शोध १५ दिवसांत घ्यावा व ते उपलब्ध न झाल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्या संबंधितांचे खुलासे घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये संबंधितांवर फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह आवश्यक कारवाई करावी व दि. ६ मे २०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. संबंधित नस्ती शोधण्यासाठी विभागाद्वारे कार्यवाही सुरू आहे. मात्र नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कामकाजाची जबाबदारी वेळोवेळी बदलल्यामुळे व नागरी जमीन कमाल धारणा कक्षाच्या कार्यासनाची वेळोवेळी पुनर्रचनाही करण्यात आली असल्यामुळे आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासाठी शासनास दोन महिन्याचा कालावधी मंजूर करण्यात यावा, अशी विनंती अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.सुरेश काकाणी यानी ३.५.२०११च्या पत्रान्वये आयोगाला केली. आयोगाने ती मान्य केल्याचे दि.१८.५२०११ च्या पत्रान्वये त्याना कळविले. त्यानंतर श्री.काकाणी यानी दि.७.७.२०११च्या पत्रान्वये सविस्तर निवेदन सादर केले. विविध विभागांकडे संबंधित नस्तीच्या अनुषंगाने घेतलेला शोध व त्यातील निष्पत्ती यांचा तपशील त्यात दिला असून 'अपीलकर्त्याने

मागणी केलेली क्र.यूएलसी-१०८९/ २१२३/नाजकधा-२, या नस्तीच्या अस्तित्वाबाबत कोणताही ठोस अभिलेख उपलब्ध होऊ शकलेला नाही. त्यामुळे संबंधित अभिलेख नष्ट क रण्याबाबतचा गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यास वर नमूद केलेल्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन प्रस्तुत प्रकरणातील दि.६.४.२०११ च्या सुनावणीतील गुन्हा दाखल करण्याच्या मौखिक आदेशांचा पुनर्विचार करण्याची वा न्यायोचित आदेश देण्याची शासनाची विनंती आहे,'असे सादर केले आहे. मात्र आयोगाने दिलेले आदेश अभिलेख नष्ट केल्याबाबतचा गुन्हा दाखल करण्याबाबतचे नसून कायमस्वरूपी जतनाचे अभिलेख जतन न झाल्याबाबतचे आहेत. त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या प्रकरणातीलच नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट होत नसल्याचे अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनावरून स्पष्ट होते, ही बाब दखल घेण्याजोगी आहे. त्यामुळे विशेष पथक नेमून संबंधित नस्तीचा शोध सर्व संबंधित विभागाकडे घेणे व अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अन्य संचिकांचे अवलोकन नि:शुल्क करू देऊन हव्या असलेल्या प्रती नि:शुल्क पुरविणे आवश्यक आहे. मात्र ही सर्व कार्यवाही विशिष्ट मुदतीत केली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या सांगली नागरी जमीन कमाल धारणा समूहाच्या क्षेत्रातील नागरी जमीन कमाल धारणाच्या अनुषंगाने शासनाने घेतलेल्या दि.२१.८.१९९६ च्या निर्णयासंबंधातील सांगली नागरी जमीन कमाल धारणा समूह या प्रकरणातील संचिकेच्या शोधासाठी अपिलीय प्राधिकारी यानी विशेष पथकाद्वारे अभिलेखाचा शोध घेऊन दि.३०.९.२०११पर्यंत कार्यवाही करून आयोगाला अहवाल सादर करावा. याच कालावधीत, संबंधित अभिलेखाच्या जतनाची जबाबदारी निश्चित करावी. नस्ती व अनुषंगिक कागदपत्रे उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास त्याच्या प्रती नि:शुल्क पुरवाव्यात व नस्ती उपलब्ध न झाल्यास कायमस्वरूपी जतनाचे अभिलेख जतन न होण्याच्या परिणामी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अन्वये सार्वजनिकरीत्या उपलब्ध ठेवणे आवश्यक

असलेली माहिती नाकारण्यास कारणीभूत ठरल्याबद्दल संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह आवश्यक कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.सुरेश काकाणी यानी करावी. वरील बाबींची पूर्तता करून अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यानी दि.५.१०.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मलिक झकारिया मेमन
बी-२/२१२, क्लोव्हर गार्डन सोसायटी, ४, नायलोर रोड, पुणे-४११००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मलिक झकारिया मेमन
बी-२/२१२, क्लोव्हर गार्डन सोसायटी, ४, नायलोर रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.जे.डी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे प्रतिनिधी श्री.अनंत भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे यानी दि.१३.८.२००९ रोजी पाठविलेल्या पत्राच्या संदर्भातील माहिती मागितली होती. संबंधित मिळकत संरक्षण खात्याची असल्याचे कळाल्यावरून त्यांच्याकडे माहिती मागितली असता त्यानी ती सार्वजनिक बांधकाम खात्याची असल्याचे कळविले.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याचा अर्ज जन माहिती अधिकाऱ्यानी संबंधित विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे वर्ग केला होता. बंगला नं.९, क्वीन्स गार्डन, पुणे या मिळकतीचा हा संदर्भ असल्यामुळे ती माहिती जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे यानी दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तम सदाशिव दळवी
आंबेगाव खुर्द, (दळवी वस्ती), पाझर तलावाशेजारी, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-४११००२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-४११००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे श्री.रणजित राजकुमार भोसले | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गावकामगार तलाठी, आंबेगाव यांच्याकडील दि.२३.७.२०१० च्या अहवालाची व सोबतच्या सर्व कागदपत्रांची प्रत मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.उत्तम सदाशिव दळवी यानी केली होती. तत्कालीन

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी त्याबाबत कोणती कार्यवाही केली हे कागदपत्रांवरून स्पष्ट होत नाही. तथापि त्याबाबत चौकशी करून आवश्यक तर अपीलकर्त्यास माहिती देण्याची दक्षता घेत आहोत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे श्री.रणजित राजकुमार भोसले यानी केले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे श्री.संदेश शिर्के यांचे याच आशयाचे लेखी निवेदन त्यानी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे यानी सादर केलेल्या निवेदनानुसार माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाला दि.३.९.२०११ पर्यंत सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ईशामुद्दीन हमीद शेख
सर्व्हे नं.१५६, हुसेनशाहबाबा नगर, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम पुलाजवळ, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम पुलाजवळ, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ईशामुद्दीन हमीद शेख
सर्व्हे नं.१५६, हुसेनशाहबाबा नगर, येरवडा, पुणे-४११००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय,
संगम पुलाजवळ, पुणे श्री.संजय प्रभाकर धायगुडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय,
संगम पुलाजवळ, पुणे श्री.गोपाळ विठ्ठल डेंगळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : वाहनाचे दस्तऐवज बाद करण्याबाबतच्या तरतुदीच्या राजपत्राची प्रत व तपशील मागितला होता. राजपत्राची प्रत हवी असून परिपत्रकाची प्रत नको आहे. हे कागद जतन करण्याबाबतची नेमकी तरतूद काय आहे याची माहिती मिळाली पाहिजे. मी मागणी केलेली कागदपत्रे नष्ट केली असल्यास त्याच्या रजिस्टरची प्रत मिळावी.

जन माहिती अधिकारी : वाहनविषयक विविध कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी नियमामध्ये नमूद असून त्यानुसार कार्यवाही केली जाते. अपीलकर्ता याना त्यांच्या वाहनाच्या संदर्भातील सन १९९९ मधील कागदपत्रांच्या प्रती हव्या होत्या. त्याचा शोध घेत असल्यामुळे तसे कळविले होते.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यास हवी असलेली माहिती परिपत्रकातील असून सही-शिक्का असलेल्या परिपत्रकाची प्रत व त्यासोबतच्या परिशिष्टांची प्रतही दिली आहे.

माहितीच्या अधिकारात दिलेली प्रत्येक प्रत प्रमाणित करून देण्याची अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही. मात्र कागदपत्रांची अधिकृतता स्पष्ट होण्याच्या दृष्टीने 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिलेली प्रत' असा शिक्का प्रत्येक प्रतीवर द्यावा. उभय बाजूंच्या मान्यतेने अपीलकर्त्यास हव्या असलेल्या कागदपत्रांबाबत आठ दिवसांत शोध घेऊन उपलब्ध कागदपत्रांची प्रत व ते नाश केले असल्यास तशा नोंदीची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. दि.१२.७.२०११ रोजी यानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे संयुक्त निवेदन अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार व उभय बाजूंच्या संयुक्त निवेदनाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम पुलाजवळ, पुणे यानी दि.३.९.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय दिगंबर खराडकर
स.नं.५१/१, फ्लॅट नं.५, घरकुल हौसिंग सोसायटी, वडगांवशेरी, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, संगम ब्रीज कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**(१)जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, संगम ब्रीज कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-५

**(२)जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह यांचे कार्यालय, सी विंग, पीएमटी कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय दिगंबर खराडकर
स.नं.५१/१, फ्लॅट नं.५, घरकुल हौसिंग सोसायटी, वडगांवशेरी, पुणे

**(१)जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, संगम ब्रीज कार्यालय, शिवाजीनगर, पुणे

**(२)जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,

| | |
|---|---|
| | पुणे नागरी समूह यांचे कार्यालय, सी विंग, पीएमटी कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, स्वारगेट, पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : नागरी जमीन कमाल धारणा कायद्यामधील माझे चुलते श्री.दत्तात्रय विश्वनाथ खराडकर यांच्या फेब्रुवारी १९७७ मध्ये दाखल केलेल्या संचिकेची कार्यालयातील रजिस्टरला नोंद आहे. मात्र संचिकेची प्रत मागितली असता उपलब्ध होत नाही. तसेच संबंधित प्रकरणी श्री.खराडकर यांच्या नावे नमूद नसून श्री.किराड यांच्या नावाने आहे. गुन्हा अन्वेषण विभागाकडे याच काळातील अनेक प्रकरणातील कागदपत्रांचा तपास चालू असून या संचिकेचाही शोध त्यानी घ्यावा, असा अर्ज त्यांच्याकडे केला. परंतु तसे आदेश राज्य सरकारकडून घ्यावे लागतात, असे त्यानी कळविले. संबंधित प्रकरणात नवी संचिका उघडण्यात आली असून मूळ संचिका मात्र उपलब्ध होत नाही.

जन माहिती अधिकारी(१)-गुन्हे अन्वेषण विभाग : संबंधित संचिकेबाबत राज्य सरकारकडून आदेश आल्याशिवाय तपास करता येत नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी (२) : याच संदर्भात अपीलकर्त्यांचे तीन अर्ज होते. त्यातील उपलब्ध माहिती दिली. मात्र त्याना ज्या संचिकेची नक्कल हवी आहे, तिची फक्त नोंद आहे. संचिका आढळून येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता दप्तरी नोंद असलेली संचिका उपलब्ध न होणे समर्थनीय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) जतनाच्या कालावधीनुसार संबंधित संचिकेबाबत जन माहिती अधिकाऱ्यानी शोध घ्यावा. ही संचिका नष्ट केली असल्यास त्याबाबतची माहिती सप्रमाण पुरवावी व ती नष्ट केली

नसल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्या संबंधितांचा खुलासा घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये पुढील कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह यांचे कार्यालय, सी विंग, पीएमटी कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, स्वारगेट, पुणे यानी करावी, व आयोगाला दि.३०.९.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर बाबुराव काळे
रा. कोरेगांव, पो. चुंब, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९४४/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मधुकर बाबुराव काळे
रा. कोरेगांव, पो. चुंब, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. यु.एस.कळसे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मौजे कोरेगांव, ता. बार्शी येथील ग्रामपंचायतीला नवीन बांधकामासाठी देण्यात आलेली मंजुरी, तसेच धर्मशाळा व तालमीच्या जुन्या इमारती पाडण्यासाठी दिलेल्या आदेशाची नक्कल अशी माहिती दि. २४/६/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते गैरहजर राहिले. अपिलाची समज मिळाल्यावर दि. ५/५/२०११ रोजी त्यानी टपालाने माहिती पाठविली. इमारती पाडल्यामुळे गावाचे नुकसान झाले व या प्रकरणातील कागदपत्रे जन माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दिली नाही.

जन माहिती अधिकारी - इमारत पाडण्याबाबत ग्रामपंचायतीने अर्ज दिला होता. अपीलकर्त्यांचा दि. २४/४/२०१० ला अर्ज प्राप्त झाल्यावर माहिती देण्यासाठी सहाय्यक जन माहिती अधिकारी याना त्यानी कळविले. त्यानी दि. २९/४/२०११ रोजी माहिती दिली. दरम्यान दि. ३१/८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती पुरविली.

माहितीबाबत केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती व जावक बारनिशीतील त्याच्या नोंदीच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी आयोगाला सादर कराव्यात. तसचे जन माहिती अधिकारी श्री. एन.डी.भोसले व सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. एस. जे. शेख यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा ४ दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु असा खुलासा व जावक बारनिशीतील नोंदीची प्रत त्यांनी सादर केलेली नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले यानी दि. २९/६/२०१० च्या पत्रान्वये सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एस. जे. शेख याना माहिती देण्याबाबत कळविल्याचे दिसते. त्यांच्याकडून दि. २९/४/२०११ रोजी माहिती पाठविल्याच्या पत्राची प्रत सादर करण्यात आली आहे. परंतु जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले यानी अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढील सुनावणीनंतर दि. ३१/८/२०१० च्या पत्रान्वये व दि. २८/४/२०११ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे दिसते.

सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर पाठविण्याआधीच जन माहिती अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही केलेली आहे. सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांच्याकडे संदर्भित माहिती प्राप्त होती, असे त्यावरुन दिसते. या स्थितीत सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. एस. जे. शेख यांच्याकडे माहिती मागणे का आवश्यक होते, हे जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले यानी स्पष्ट केलेले नाही. मात्र सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. एस. जे. शेख यानीही वर्ग केलेल्या अर्जावर विहित मुदतीत उत्तर दिलेले नाही. म्हणून दोघेही शास्तीस पात्र ठरतात. सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. एस. जे. शेख यांची जबाबदारी केवळ तांत्रिक स्वरुपाची असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याना समज म्हणून प्रतिकात्मक शास्ती लावणे व मुख्य जबाबदारी जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले यानी पार न पाडल्यामुळे व झालेल्या विलंबाबाबत त्याना शास्ती लावणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती देण्यास दि. २४/६/२०१० ते ३१/८/२०१० अशा एकूण ६९ दिवसांच्या विलंबासाठी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले याना रु. १७,२५०/- शास्ती लावण्यात येत आहे.शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले यांच्या माहे सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ च्या अनुक्रमे ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ व जानेवारी २०१२ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

३) तसेच सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एस. जे. शेख याना समज म्हणून प्रतिकात्मक शास्ती रु. ५०००/- लावण्यात येत असून शास्तीची रक्कम श्री. एस.

जे. शेख यांचे माहे सप्टेंबर २०११ च्या अनुक्रमे ऑक्टोबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अजित किसनराव तावरे
मु.पो.कोऱ्हाळे बु., ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, पुणे यांचे कार्यालय, लक्ष्मीरोड, पुणे-३० उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपमहाव्यवस्थापक, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अजित किसनराव तावरे
मु.पो.कोऱ्हाळे बु., ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, पुणे यांचे कार्यालय, लक्ष्मीरोड, पुणे सौ.सोनाली रावल-ठाकूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, ता.बारामती, जि.पुणे यांच्याकडून दिलेला लाभांश आदीबाबतची सन १९९५ ते दि.१० जानेवारी २००९ या काळातील माहिती मागितली होती. कळविलेले शुल्क भरूनही अपुरी माहिती मिळाली. मुद्दा क्र.३,४,५ ची माहिती अपुरी आहे.

<u>तत्कालीन अपिलीय प्राधिकारी</u> : जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती दिली असल्याचे दिसून येते. मात्र जादा शुल्क आकारले असल्यास ते परत करावे, असा निर्णय प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिला. शासकीय दूध योजना माळेगाव, बारामती ही शासकीय मालकीची दूध योजना, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाला कायमस्वरूपी मालकी हक्काने हस्तांतरित करण्यात आली आहे.

<u>विद्यमान अपिलीय प्राधिकारी</u> : केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छता दूध उत्पादन योजनांतर्गत रू.३१२.६० लाख इतके अनुदान दूध संघाला प्राप्त झालेले आहे.

अपीलकर्ता यानी दि.१४.१.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली १५ वर्षांच्या काळातील माहिती संकलित करून अपीलकर्त्यास शुल्क कळविले व त्यानी शुल्क भरल्यानंतर दि.२.२.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. याच माहितीची प्रत अपिलीय प्राधिकारी यांच्यासमोर दि.१६.३.२००९ रोजी रोजी अपिलाच्या वेळी अपीलकर्त्यास समक्ष दिली, असे जन माहिती अधिकारी तथा उपमहाव्यवस्थापक, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, ता.बारामती, जि.पुणे श्री.विष्णुपंत जगताप यानी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात माहितीच्या प्रतीसह नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. संबंधित संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिनियमातील कलम २ मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरते याचे पुरावे अपीलकर्त्यानी सादर केलेले नाहीत. तरीही माहिती देण्यात आली आहे. अन्य सभासदांच्या संदर्भातील आर्थिक स्वरूपाची माहिती अपीलकर्त्यास मागता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल श्रावण शिंदे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत,
बारामती, जि. पुणे ४१३ १०२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, स्वारगेट, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय अधिकारी,
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुनिल श्रावण शिंदे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत, बारामती, जि. पुणे ४१३ १०२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, स्वारगेट, पुणे श्री. एस. बी. भंडारे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा शासकीय अधिकारी,
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे श्री. अरुण चांगदेव कोल्हे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - बारामती तालुक्यात 'सन २००५ पासून आजअखेर पर्यंत' स्वाभिमान सबळीकरण योजनेच्या कार्यवाहीची माहिती दि. १७/९/२००९ चा अर्जान्वये मागितली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली नाही.

<u>तत्कालीन जन माहिती अधिकारी</u> - जन माहिती अधिकारी पदाचा पदभार माझ्याकडे तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आला होता. सहा. जन माहिती अधिकारी श्री. एच. ए. इष्टे यानी अपीलकर्त्यांची मागणी माझ्या निदर्शनास आणली नाही. प्रथम अपिलाच्या वेळीही हा अर्ज मला मिळाला नाही.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी/सहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनेक पदांचा अतिरिक्त कार्यभार, रिक्त पदे व त्याच काळात ९०० हून अधिक महाविद्यालयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप यामुळे माहिती संकलित करुन देणे शक्य झाले नाही. आता सोबत आणली आहे.

अपीलकर्त्यांनी सुमारे ५ वर्षांच्या कालावधीतील संपूर्ण तालुक्याची विस्तृत माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये जन माहिती अधिकारी ती नाकारु शकतात. तथापि त्यानी माहिती देण्याबाबत कार्यवाही केली असून ती योग्य आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी/सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचा खुलासा अपिलीय प्राधिकारी यानी ८ दिवसांत आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी यानी दि. ८/७/२०११ च्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरुण चांगदेव कोल्हे व सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. एच. ए. इष्टे यांच्या खुलाशासह अहवाल आयोगाला सादर केला. सहा. जन माहिती अधिकारी श्री. एच. ए. इष्टे यांचा खुलासा मान्य करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शासकीय अधिकारी, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, पुणे श्री. अरुण चांगदेव कोल्हे यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जाबाबत तत्परतेने जबाबदारी पार न पाडल्याबद्दल समज देण्यात येत आहे.

अपीलकर्त्यांनी आयोगापुढील सुनावणीच्या दिवशी माहिती न स्वीकारल्यामुळे व नंतर कार्यालयाशी संपर्क न साधल्यामुळे दि.३०/६/२०११ रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रावरुन दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धैर्यशील रामदास पाटील
श्री.रामदास महादेव पाटील
मु.पो.भवानीनगर, शिक्षक कॉलनी नं.१, रूम नं.७, इंदापूर, जि.पुणे-४१२१०४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धैर्यशील रामदास पाटील
मु.पो.भवानीनगर, शिक्षक कॉलनी नं.१, रूम नं.७, इंदापूर, जि.पुणे-

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर श्री.परमेश्वर मा.राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.अजितकुमार देशपांडे, श्री.एन.एल.काळे, विस्तार अधिकारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मौजे फोंडशिरस, ता.माळशिरस येथील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्याविरूध्द तक्रार करून त्याना बडतर्फ करण्याची मागणी अर्जाद्वारे केली होती. त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यानी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे त्याबाबत कळविले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे माहिती मागितली असता त्यानी गटविकास अधिकारी यांच्याकडे संपर्क साधण्यास कळविले. तसा संपर्क साधूनही संबंधितावर कारवाई केल्याची माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : तक्रार अर्जावर चौकशी करून अहवाल सादर करण्यास विस्तार अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.एन.एस.काळे याना कळविले होते. सहा स्मरणपत्रे पाठवूनही त्यानी चौकशी अहवाल सादर केला नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही. चौकशी अहवालाशिवाय अपीलकर्त्याच्या मागणीनुसार कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

तत्कालीन विस्तार अधिकारी : जन माहिती अधिकाऱ्यानी माझ्याकडे अर्ज पाठविला होता, तेव्हा प्रकरणाची चौकशी चालू होती. दरम्यानच्या काळात मला निलंबित करण्यात आले असून नव्याने पदभार स्वीकारलेले विस्तार अधिकारी याबाबत चौकशी करीत आहेत.

अपिलीय प्राधिकारी : माहिती पंचायत समितीच्या स्तरावरील असून कक्ष अधिकारी हे जन माहिती अधिकारी आहेत. अपीलकर्त्यानी तक्रार केलेल्या प्रकरणात अद्यापही चौकशी चालू असून या विषयाला राजकीय संदर्भ असल्यामुळे चौकशी पूर्ण होण्याआधीच संबंधितांच्या जाबजबाबाच्या प्रती दिल्यास चौकशीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी मुख्यतः प्रशासकीय कार्यवाहीची आहे, 'माहिती'ची नाही. तसेच जन माहिती अधिकारी यानी सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून श्री.एन.एल.काळे, विस्तार अधिकारी याना स्मरणपत्रे दिली असली तरी ती प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतची आहेत. चौकशी करून कारवाई करून माहिती द्यावी, अशी मागणी

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. मात्र संबंधित प्रकरणी चौकशी पूर्ण होताच अहवालाची प्रत अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.दमयंती शहा
७४, महावीरनगर, वखारभाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (अ व प्र),
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४९ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (अ व प्र),
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई प्रतिनिधी श्री.बी.बी.भिंगारे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई प्रतिनिधी श्री.बी.बी.भिंगारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जानेवारी १९९६ ते फेब्रुवारी २०१० या काळात सार्वजनिक आरोग्य विभागात देण्यात आलेली तात्पुरती व नियमित पदोन्नती व ती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांची यादी आदी माहिती अपीलकर्त्या डॉ.दमयंती शहा यानी दि.२७.३.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दि.८.४.२०१०च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर व माहिती दिली. अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरून त्यानी अपील केले. प्रथम

अपिलाच्या सुनावणीला त्या उपस्थित राहिल्या नाहीत. काही बाबींचे स्पष्टीकरण व अतिरिक्त माहिती त्यानी अपिलात मागितली होती. माहिती तयार असून घेण्यासाठी त्या आल्या नाहीत. आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत नागरिकांची सनद या पुस्तिकेची प्रत विनामूल्य देण्याची मागणीही त्यानी केली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.बी.बी.भिंगारे यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. स्पष्टीकरण, खुलासा अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही. नागरिकांची सनद ही सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती आहे. तथापि ही सनद व अन्य माहिती अपीलकर्त्यांना टपालाने पाठवून आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे दि.५.७.२०११ व दि.१२.७.२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई श्री.एन.एम.ठाकरे यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.पांडुरंग नामदेव जाधव
सुजय बंगला, डॉ.लोखंडे हॉस्पिटलसमोर, मोहननगर, चिंचवड, पुणे-४११०१९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे
यांचे कार्यालय, पाषाण, पुणे-४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन,
चाकण, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.पांडुरंग नामदेव जाधव
सुजय बंगला, डॉ.लोखंडे हॉस्पिटलसमोर, मोहननगर, चिंचवड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे
यांचे कार्यालय, पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन,
चाकण, ता.खेड, जि.पुणे प्रतिनिधी श्री.व्ही.एस.पुजारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : अपघातामधील टेम्पोचा एफआयआरमधील नंबर व पंचनाम्यातील नंबर वेगवेगळा असल्यामुळे खरा नंबर कोणता याबाबतचा खुलासा विचारला होता. जन माहिती अधिकाऱ्यानी विलंबाने व चुकीची माहिती दिली.

अपिलीय प्राधिकारी : एमएच-०९-क्यू-५३८७ असा वाहनाचा नंबर असून कर्मचाऱ्याने नजरचुकीने एमएच-०९-क्यू-५३७८ असा लिहिला. चुकीची माहिती सहेतूक देणे अथवा दिशाभूल करणे असा उद्देश नव्हता. केवळ हस्तदोषामुळे झालेली चूक असल्यामुळे प्रथम अपिलाच्या वेळी तसे स्पष्ट करून माहिती दिली व मागणीप्रमाणे माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांनी लेखी दिले आहे.

वाहनाचा नेमका नंबर नमूद करणारे पत्र जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास त्वरित द्यावे. तसेच माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत सहा. जन माहिती अधिकारी यानी श्री.सुरेश घाडगे याना एका आठवड्यात खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सुनावणीच्या दिवशीच वाहनाच्या नेमक्या नंबरचे पत्र पोलीस उपनिरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन यानी आयोगाला सादर केले. अपीलकर्त्यास त्याची प्रत देणे आवश्यक आहे. श्री.सुरेश घाडगे यानी दि.४.३.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. संबंधित प्रकरणातील तपासी अंमलदार श्री.एस.एन.भवारी यांची बदली व त्यांच्याकडून कागदपत्रे प्राप्त होणे यामुळे विलंब झाल्याचे त्यानी अहवालात नमूद केले आहे. संबंधित कागदपत्रे स्वतःबरोबर घेऊन जाण्याबद्दल श्री.भवारी यांच्यावर

केलेली कारवाई त्यात स्पष्ट केलेली नाही. ती करणे व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रविण साळवे
३९५, विष्णुछाया अपार्टमेंट, मंगळवार पेठ, पुणे-४११००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभाग अधिकारी, क प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे-४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, क प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रविण साळवे
३९५, विष्णुछाया अपार्टमेंट, मंगळवार पेठ, पुणे-४११००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभाग अधिकारी, क प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे श्री.दिलीप काशिनाथ गावडे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, क प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे विद्यमान-श्री.ए.जी.भोसले, तत्कालीन-श्री.एस.जे.वाबळे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन २००३ ते २००९ अखेर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपट्टी थकबाकीदारांची यादी व पाणी शुध्दतेच्या अहवालासह अन्य माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली नसल्याचे नमूद करून माहिती नि:शुल्क देण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.आर.डी.गायकवाड यानी दिले. परंतु लेखी आदेश दिले नाहीत.

जन माहिती अधिकारी : ६ वर्षांच्या काळातील अत्यंत विस्तृत स्वरूपातील माहिती अपीलकर्त्यानी मागितली होती. मूळ अर्जाशिवाय आणखी काही माहिती त्यानी प्रथम अपिलात मागितली. तसेच पाणी पिण्यायोग्य असण्याबाबतचा अहवाल तयार करून देणे ही प्रशासकीय कार्यवाहीची मागणी असून त्याचीही पूर्तता केली. अर्ज सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री.मंगेश अनंतराव शिणगारे यांच्याकडे माहिती देण्यासाठी सोपविला होता. परंतु त्याना जनगणनेचे काम देण्यात आल्यामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही. दि.१५.२.२०१० च्या अर्जानुसार ३००पानांची माहिती दि.१५.५.२०१० रोजी प्रथम अपिलाच्या वेळी दिली.

सहाय्यक जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याचा अर्ज दि.१८.२.२०१० रोजी प्राप्त झाला. दि.१९.२.२०१० रोजी शिवजयंतीची सुट्टी होती व दि.२०.२.२०१० रोजी जनगणनेच्या कामाकडे मला पाठविण्यात आले. दि.१५.९.२००९ पर्यंत ते काम चालू होते. तसेच मागितलेली माहिती विस्तृत असल्यामुळे वेळात वेळ काढून याच काळात माहिती संकलित करीत होतो, म्हणून विलंब झाला.

विलंबाचे तपशिलवार लेखी निवेदन श्री.शिणगारे यानी जनगणनेबाबतच्या संबंधित कामाच्या आदेशाच्या प्रतींसह सादर केले.

अपिलीय प्राधिकारी : तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.आर.डी.गायकवाड निवृत्त झाले असून त्यानी लेखी आदेश दिलेले नाहीत. प्रत्येक ग्राहकाच्या नळ जोडणीबाबतची माहिती, अशा स्वरूपाची विस्तृत माहिती संकलित करून द्यावयाची होती. जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी ती संकलित करून दिली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती अपीलादरम्यान मागता येणार नाही. तसेच खुलासा, स्पष्टीकरण,(पाणीशुध्दतेचा अहवाल तयार करून देण्यासारख्या) प्रशासकीय कार्यवाहीची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमाच्या कलम २ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाहीत. सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी केलेला खुलासा लक्षात घेता विलंब समर्थनीय असल्यामुळे मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत सावळाराम तागडे
प्लॅट नं.७३, ओम श्री शिवशक्ती निवास, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हनुमंत सावळाराम तागडे
प्लॅट नं.७३, ओम श्री शिवशक्ती निवास, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा
श्री.एस.एन.शेरखाने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव (वडूज),
ता.खटाव, जि.सातारा श्री.बी.एस.मोहिते

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मी तलाठी पदावर काम करीत असतानाच्या नोव्हेंबर व डिसेंबर १९९१ व जानेवारी ते मार्च १९९२ या कालावधीच्या पगारपत्रकाच्या नकला मागितल्या होत्या. दोन महिन्याचा पगार मला मिळालेला नाही. पगारपत्रकाच्या प्रतीप्रमाणेच रक्कम अदा केल्याच्या व्हाऊचर्सच्या प्रती दिल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी दि.८.४.२०१० च्या अर्जाद्वारे पगारपत्रकाच्या बिलाच्या छायांकित प्रती मागितल्या होत्या. दि.२९.४.२०१० च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. दि.५.५.२०१० रोजी शुल्क भरून त्यानी चलन सादर केल्यावर दि.११.५.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने प्रती पाठविल्या. पगार अदा केलेल्या व्हाऊचर्सची रेव्हेन्यू स्टॅम्प लावलेली व त्यावर स्वाक्षरी असलेली अशी प्रत नंतर त्यानी मागितली. शोध घेऊनही व्हाऊचर्स आढळली नाहीत. तसे अपीलकर्त्यास कळविले.

अपीलकर्त्याने मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती अपिलात मागितली असून ते योग्य नाही. तथापि त्या कागदपत्रांचाही शोध घेण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यानी केला असल्याचे दिसते. पुनश्च शोध घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यानी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्री.बी.एस.मोहिते यानी दि.१५.७.२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत सावळाराम तागडे
प्लॅट नं.७३, ओम श्री शिवशक्ती निवास, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.हनुमंत सावळाराम तागडे<br>प्लॅट नं.७३, ओम श्री शिवशक्ती निवास, ता.फलटण, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा<br>श्री.एस.एन.शेरखाने<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव (वडूज),<br>ता.खटाव, जि.सातारा श्री.बी.एस.मोहिते | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मी तलाठी पदावर काम करीत असतानाच्या नोव्हेंबर व डिसेंबर १९९१ व जानेवारी ते मार्च १९९२ या कालावधीच्या पगारपत्रकाच्या नकला मागितल्या होत्या. दोन महिन्याचा पगार मला मिळालेला नाही. पगारपत्रकाच्या प्रतीप्रमाणेच रक्कम अदा केल्याच्या व्हाऊचर्सच्या प्रती दिल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी दि.८.४.२०१० च्या अर्जाद्वारे पगारपत्रकाच्या बिलाच्या छायांकित प्रती मागितल्या होत्या. दि.२९.४.२०१० च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. दि.५.५.२०१० रोजी शुल्क भरून त्यानी चलन सादर केल्यावर दि.११.५.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने प्रती पाठविल्या. पगार अदा केलेल्या व्हाऊचर्सची रेव्हेन्यू स्टॅम्प लावलेली व त्यावर स्वाक्षरी असलेली अशी प्रत नंतर त्यानी मागितली. शोध घेऊनही व्हाऊचर्स आढळली नाहीत. तसे अपीलकर्त्यास कळविले.

अपीलकर्त्याने मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती अपिलात मागितली असून ते योग्य नाही. तथापि त्या कागदपत्रांचाही शोध घेण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यानी केला असल्याचे दिसते. पुनश्च शोध घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यानी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्री.बी.एस.मोहिते यानी दि.१५.७.२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेश शेंडे
७४/२, निखील अपार्टमेंट, लॉ कॉलेज रोड, पुणे-४११००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगरसचिव, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभार उपनगरसचिव, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेश शेंडे
७४/२, निखील अपार्टमेंट, लॉ कॉलेज रोड, पुणे-४११००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगरसचिव, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.सुनिल नारायण पारखी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभार उपनगरसचिव, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.राजेंद्र हरिभाऊ शेवाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : जगातील ज्या शहरांबरोबर पुणे महानगरपालिकेने सिस्टर सिटी करार केला त्याची दि.१ जानेवारी १९९५ ते दि.२ जून २०१० पर्यंतची संपूर्ण माहिती मागितली होती. करारासाठी महानगरपालिकेचे अधिकारी व सदस्य यानी केलेले दौरे, या करारांमधून पुणे शहराला व पुणे महानगरपालिकेला झालेले फायदे, कोणत्या शहरांबरोबर करार का झाले किंवा का झाले नाहीत इ. तपशीलही मागितला होता. परंतु अशा करारांबाबतची नियमावली व सिस्टर सिटीच्या संदर्भातील अहवाल जाहीर करण्याच्या मागणीनुसार पूर्तता झाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : आठ शहरांबरोबर पुणे महानगरपालिकेने सिस्टर सिटी करार केले आहेत. आवक लिपिकांकडून जन माहिती अधिकारी यांच्यापर्यंत माहिती न पोहोचल्यामुळे विलंब झाला. संबंधित सेवकावर कडक कारवाई करीत आहोत. कराराबाबतची आमच्या कार्यालयाकडील उपलब्ध माहिती देण्यात येत असून अशा कराराचा महानगरपालिकेला झालेला फायदा इ.चा अहवाल तयार केलेला नाही, त्यामुळे देता येत नाही.

अपीलकर्त्यानी १५ वर्षांच्या काळातील माहिती मागितली असून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.५,६,७ यासारख्या विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या अधिनियमाच्या कलम २ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाहीत. तसेच एखाद्या विषयाच्या संदर्भातील अहवाल तयार करून पुरविण्याची मागणी या अधिनियमांतर्गत करता येत नाही. मात्र अपीलकर्त्यानी मांडलेला विषय सार्वजनिक हिताच्या संदर्भातील असल्यामुळे संबंधित कराराच्या पती व उपलब्ध अनुषंगिक कागदपत्रे अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावीत, तसेच अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी दि.११.५.२००११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भिवाजी बबनराव धुमाळ
धनश्री, राजपथ सोसायटी, लेन नं.७, परमहंसनगर, कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५२ / २०१० / २०११ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भिवाजी बबनराव धुमाळ
धनश्री, राजपथ सोसायटी, लेन नं.७, परमहंसनगर, कोथरूड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे श्री.रामचंद्र नामदेव जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे तत्कालीन श्री.संभाजी विठ्ठल जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांची भरती व त्या अनुषंगाने तीन लेखनिकाच्या नियुक्तीसंदर्भातील माहिती मागितली होती. जाहिरातीतील अटींचे पालन न करता व लेखी परीक्षा न घेता नेमणूक केली आहे. त्यामुळे माहिती अपुरी व विलंबाने दिली.

जन माहिती अधिकारी : लेखी परीक्षा त्यावेळी घेण्यात आली नसल्यामुळे अपीलकर्त्यांना गुणपत्रिका देणे शक्य नाही. निवड झालेल्या व्यक्तींचे अर्ज व अनुषंगिक कागदपत्रे यांच्या प्रती अपीलकर्त्यास हव्या असल्यास देता येतील. मागितलेली सर्व माहिती सहायकांकडून वेळेत प्राप्त न झाल्यामुळे विलंब झाला.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती देण्यास विलंब केल्याबद्दल श्रीमती निर्मला प्रकाश देशमुख, कार्यालय अधीक्षक व श्रीमती प्रभा शशांक पाध्ये, वरिष्ठ लेखनिक या कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्याची कारवाई केली आहे.

परीक्षा प्रक्रिया व नेमणुका याबाबतचे अपीलकर्त्यांचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या अधिनियमाच्या कक्षेतील विषय नाही. तसेच न झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रकाची प्रत देता येणार नाही, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिपादन योग्य आहे. तथापि अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती १० दिवसांत पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. वास्तविक उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यास विलंब झाल्याबद्दल संबंधितांना शास्ती करण्याचे अधिकार अपिलीय प्राधिकारी याना नाहीत. तथापि अपिलीय प्राधिकारी यानी संबंधितांवर एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई प्रशासकीय अधिकारात केली असून जणू आयोगानेच केलेली ती शास्ती आहे, असे समजून या कारवाईस मान्यता देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित प्रकरणातील अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर जगन्नाथ बाबर
स.नं.८२, संकल्प सरस्वतीनगर, नवी सांगवी, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनोहर जगन्नाथ बाबर
स.नं.८२, संकल्प सरस्वतीनगर, नवी सांगवी, पुणे-२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे श्री.रामचंद्र नामदेव जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, पुणे तत्कालीन श्री.संभाजी विठ्ठल जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : शिक्षण मंडळातील काही पदांच्या संदर्भात नियमातील तरतुदीची व त्या अनुषंगिक नेमणुकीबाबतची स्पष्टीकरणात्मक विचारणा केली होती. तसेच या पदाना महानगरपालिका आयुक्त व शासन यांची मान्यता घेतल्याच्या पत्राची प्रत मागितली होती. माहिती विलंबाने व अपूर्ण दिली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : माहिती देण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याना सूचना दिल्या होत्या. परंतु त्यानी विलंबाने माहिती दिल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झाला.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याना नियमातील तरतुदीबाबतच्या स्पष्टीकरणात्मक स्वरूपाची विचारणा केली असूनही त्यासह सर्व माहिती दिली. मात्र ती विलंबाने दिल्याबद्दल श्रीमती निर्मला प्रकाश देशमुख, कार्यालय अधीक्षक व श्रीमती प्रभा शशांक पाध्ये, वरिष्ठ लेखनिक यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्याची कारवाई केली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखी माहिती देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. तसेच नियमातील तरतुदींचा अन्वयार्थ, कार्यपध्दतीबाबतचा खुलासा, अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमांतर्गत करता येत नाही. माहिती विलंबाने दिल्याबद्दल संबंधितांना शास्ती करण्याचे अधिकार अपिलीय प्राधिकारी याना नाहीत. तथापि अपिलीय प्राधिकारी यानी संबंधितांवर एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई प्रशासकीय अधिकारात केली असून जणू ती आयोगानेच केलेली शास्ती आहे, असे समजून या कारवाईस मान्यता देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५०+२५९५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय,
शिवाजीनगर, पुणे श्री.संतोष संपत भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त
कार्यालय, शिवाजीनगर, पुणे श्री.हरिभाऊ नारायण कसबे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : युनायटेड स्पिरिट लि., पिंपळी या कंपनीत कामगारांचा सन २००९ ते २०११ या काळातील पगारवाढीचा करार भ्रष्ट मार्गाने झाला. कामगार संघटनेचा मी सचिव असूनही कराराची प्रत मला मिळालेली नाही ती मला मिळाली पाहिजे. ज्या कामगार संघटना प्रतिनिधींनी करार केला त्यानाच त्यातील तरतुदी माहीत नाहीत व कामगारांनाही कळलेल्या नाहीत. या कराराची माहिती मागितली असता 'शासनाकडून उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल,' असे उत्तर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून देण्यात आले.(अपील क्र.२५५०/२०१०/पुणे) कामगार आयुक्तांपुढे कामगारांचे प्रश्न मांडल्यानंतर ते त्यांच्या अधिकारात येतात की नाही, याचा नेमका खुलासा होत नाही. म्हणून त्यांच्या अधिकाराची माहिती मिळावी, अशी मागणी केली होती. तीही माहिती दिली नाही.(अपील क्र.२५९५ / २०१० / पुणे)

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : कामगार संघटना व कंपनी यांच्यात परस्पर करार होतो. कंपनीने आमच्या कार्यालयाला त्याची प्रत सादर करावयाची असते. परंतु अशी प्रत आम्हाला उपलब्ध झालेली नाही.

अपीलकर्त्याची कराराबाबतची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तसेच कामगार संघटनेच्या सचिवांना कराराची प्रत देणे बंधनकारक आहे की नाही, हा उक्त अधिनियमाच्या कक्षेतील विषय नाही. तथापि प्रस्तुत विषयातील सार्वजनिक संदर्भ लक्षात घेता संबंधितांकडून कराराची प्रत प्राप्त करून घेऊन ती, व कामगार आयुक्तालयातील प्रमुखांचे अधिकार व कर्तव्ये याबाबतची नागरिकांच्या सनदेची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी यानी दि.११.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. किरण गणपतराव सुरवसे
शिवतेज बिल्डिंग, सर्व्हे नं. ५२/२,
नंदनवन कॉलनी, विनायक नगर, कृष्णा चौक,
पिंपळे गुरव, पुणे ४११ ०२७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (उच्च शिक्षण),
१७, डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक लेखाधिकारी सहसंचालक,
(उच्च शिक्षण), १७, डॉ.आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. किरण गणपतराव सुरवसे
शिवतेज बिल्डिंग, सर्व्हे नं. ५२/२, नंदनवन कॉलनी, विनायक नगर,
कृष्णा चौक, पिंपळे गुरव, पुणे ४११ ०२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (उच्च शिक्षण),
१७, डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे डॉ. नरेंद्र मारुतराव कडू

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक लेखाधिकारी सहसंचालक,
(उच्च शिक्षण), १७, डॉ.आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे श्री. विलास दगडूजीराव मारणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माझी नियुक्ती अर्धवेळेवरुन पूर्ण वेळ करण्यात आल्याबाबतच्या मूळ प्रस्तावाची प्रत मागितली होती व त्या अनुषंगाने अन्य माहिती मागितली होती. २८ तासिका कार्यभार असलेल्यांपैकी ७ प्रकरणांची माहिती मागितली होती. ती पूर्ण माहिती दिलेली नाही. तसेच भविष्य निर्वाह निधीचे माझे खाते उघडलेले नाही. ते का उघडलेले नाही, याचा खुलासा केला जात नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या दि. १/६/२०१० च्या अर्जानुसार प्रस्तावाच्या प्रती व अन्य प्रश्नांची उत्तरे दि. १७/६/२०१० च्या पत्रान्वये दिली.

अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जानुसार जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत माहिती दिली आहे. कारणे, खुलासा अशा स्वरुपाची अथवा प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम (२) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती' च्या संज्ञेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप रतनलाल ओसवाल
'आनंद रत्न', बंगला नं. ७, राजलक्ष्मी सोसायटी,
सर्व्हे नं. ५८६/४/अ, मार्केटयार्ड रोड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
वैद्यकीय अधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** -श्री. दिलीप रतनलाल ओसवाल
'आनंद रत्न', बंगला नं. ७, राजलक्ष्मी सोसायटी,
सर्व्हे नं. ५८६/४/अ, मार्केटयार्ड रोड, गुलटेकडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे डॉ. रेणू भारव्दाज

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
वैद्यकीय अधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे श्री. रमेश एन. जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता-महाराष्ट्र शासनाने दारिद्रय रेषेखाली गरीब रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी 'जीवनदायी' अर्थसहाय्य योजनेमध्ये पिवळी शिधापत्रिकाधारक रुग्णांना रु. १ लाखपर्यंतचे अर्थसहाय्य मंजूर करण्याची तरतूद असूनही योग्य कार्यवाही केली जात नाही. शासनाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले असूनही ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यानी नियम ठरविले असून पिवळी शिधापत्रिकाधारक रुग्णांकडून सक्तीने उत्पन्नाचा व रहिवासी दाखला मागतात व तो दिल्याशिवाय जीवनदायी योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मंजूर करत नाहीत. तहसीलदार कार्यालयाकडून हा दाखला मिळण्यासाठी ३ ते ६ महिने एवढा कालावधी लागतो. त्यामुळे गंभीर आजाराचा एखादा रुग्ण केवळ उपचार न मिळाल्यामुळे मरण पावतो. याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ यांच्याशी चर्चा करुनही योग्य कार्यवाही होत नसल्यामुळे व योग्य माहिती दिली नसल्यामुळे संबंधितास शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. २८/४/२०१० च्या अर्जाला दि. २६/५/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. अपीलकर्त्यांनी माहितीचे स्पष्टीकरण मागितले असूनही विषयाचे स्वरुप लक्षात घेऊन उत्तर व स्पष्टीकरणही दिले. उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ, पुणे याना या संदर्भात पाठविलेल्या पत्राची प्रतही अपीलकर्त्यांना दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीविषयीची तक्रार व प्रशासकीय कार्यवाहीची मागणी अशा संमिश्र स्वरुपाची असून माहितीचा मागणी म्हणून मुख्यत: तक्रारअर्ज व पत्रव्यवहार केला आहे. माहिती देण्यात आली असून तक्रार व प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रकांत चन्नाप्पा हिरमुखे
स. नं. ४५/४ ब, खराडी रोड, चंदननगर, पुणे ४११ ०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
एम.ई.एस.गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, कर्वे रोड, पुणे ४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. चंद्रकांत चन्नाप्पा हिरमुखे
स. नं. ४५/४ ब, खराडी रोड, चंदननगर, पुणे ४११ ०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे श्री. सुनिल भगर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
एम.ई.एस.गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, कर्वे रोड, पुणे डॉ.एन.एस.उमराणी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या एकूण माध्यमिक संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या व नावे याचा सन १९९८-९९ ते २०००-२००१ या कालावधीतील अर्थशास्त्र विषयाच्या पूर्ण वेळ सहशिक्षक म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांची यादी आदि माहिती मागितली होती. परंतु पूर्ण वेळ सहशिक्षक नियुक्तीबाबतची माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता यानी वैयक्तिक संदर्भाच्या अनुषंगाने माहिती मागितली असून वेळोवेळी महाविद्यालयाकडून माहिती त्याना दिली आहे. नियुक्ती प्रक्रियेबाबतची माहिती संस्थेच्या कक्षेतील असून संस्थेकडून घेण्यासाठी विहित मुदतीत कळविले. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे संस्थेने अपीलकर्त्यास कळविले.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी मागितलेली काही माहिती महाविद्यालयाकडील व काही माहिती महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे या संस्थेकडील होती. दोघांच्याही वतीने संस्थेचे प्रतिनिधी श्री. डी. व्ही. कलंत्रे, प्रबंधक, गरवारे वाणिज्य महाविद्यालय हे उपस्थित होते. माहिती देण्याचे आदेश त्याना दिले होते. महाविद्यालयाने माहिती दिली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे संस्थेने लेखी कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,पुणे या संस्थेने दिलेले उत्तर योग्य होते. तथापि शैक्षणिक संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५०६७/२००९ व रिट पिटीशन क्र.५१६८/२०१० प्रकरणी दिला आहे. ते लक्षात घेता संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे. त्यानुसार ८ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती द्यावी,असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/सचिव याना दि. १२/९/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हेमंत घनश्याम चोपडे
सोमवार पेठ, पोलीस वसाहत, बिल्डिंग नं.३, रूम नं.८, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस आयुक्त(प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मानवी संसाधन विभाग, मुख्यालय, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग, मुख्यालय, पुणे शहर श्री.प्रकाश घार्गे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

तक्रारी अर्जावरील कारवाईबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.हेमंत घनश्याम चोपडे यानी दि.१०.६.२००८ च्या अर्जान्वये मागितली होती. दि.८.७.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. तत्कालीन जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग, मुख्यालय, पुणे शहर यांच्या आजारपणामुळे माहिती देण्यास विलंब झाला. याच संदर्भात पुन्हा अर्ज करून त्यानी दि.६.५.२००९ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. तीही दिली. एकाच विषयाबाबत अपीलकर्ता पुनः पुन्हा त्याच स्वरूपाच्या तक्रारी बाबत पत्रव्यवहार व माहिती मागणीचे अर्ज करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग, मुख्यालय, पुणे शहर श्री.प्रकाश घार्गे यानी केले.

एकाच विभागाबाबत पुनः पुन्हा माहिती मागणीची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. मात्र अधिनियमातील माहिती मागणीच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले गेले नाही याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग, मुख्यालय, पुणे शहर श्री.पी.एस.परांजपे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माधव शंकर पिसाळ
हल्ली मु.स.नं.२०१२, घर नं.३००/६, काशिनाथ पाटीलनगर,
धनकवडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
जावली (मेढा), ता.जावली, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,
जावली (मेढा), ता.जावली, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव शंकर पिसाळ
हल्ली मु.स.नं.२०/२, घर नं.३००/६, काशिनाथ पाटीलनगर, धनकवडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, जावली (मेढा), ता.जावली,
जि.सातारा विद्यमान-श्री.आर.बी.बाबर, तत्कालीन-स.य.जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आमच्या जागेतील शेडचे अतिक्रमण वारंवार तक्रार करूनही ग्रामपंचायत काढत नाही. सन १९८६ मध्ये मी खरेदी केलेल्या जागेत संबंधित जागा येत असूनही अतिक्रमण काढण्याऐवजी माझ्याकडेच कागदपत्रे व पुरावे ग्रामपंचायत मागते.

जन माहिती अधिकारी : दोन स्वतंत्र मिळकती असून आपल्या जागेत अतिक्रमण झ ाल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे. त्याबाबत ग्रामपंचायतीने त्याना समक्ष बोलाविले असता ते आले नाहीत. त्यांची मागणी त्याना न्यायालयात मांडावी लगेल, असे ग्रामपंचायतीच्या बैठकीतील निष्कर्ष आहे. ग्रामपंचायतीच्या दप्तरानुसार संबंधित जागेबाबतची स्पष्टीकरणात्मक माहिती त्याना देण्यात आली आहे.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे
अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठाण, औंध, ता.खटाव, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, मायणी, ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४.१.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे<br>अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठाण, औंध, ता.खटाव, जि.सातारा | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मायणी, ता.खटाव, जि.सातारा येथील पोलीस ठाण्यामध्ये आलेल्य तक्रारी, पोलीस कल्याण निधीचे उद्दिष्ट आदीबाबतची सन २००५ ते २००९ या काळातील माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, मायणी, ता.खटाव, जि.सातारा यानी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा यानी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे यानी केली.

जन माहिती अधिकारी अपिलीय प्राधिकारी आयोगापुढील सुनावणीला अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही कागदपत्रे त्यानी सादर

केलेली नाहीत. मात्र अपीलकर्त्यांनी सरसकट व विस्तृत स्वरूपातील माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमाच्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, मायणी, ता.खटाव, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा यानी सुनावणीला गैरहजर असल्याबाबत व माहिती-मागणी अर्जावर केलेली कार्यवाही याबाबत आयोगाने स्मरण देऊनही कोणताही खुलासा केलेला नाही, ही बाब गंभीर आहे. याबाबतचा खुलासा दि.१५.९.२०११ पर्यंत सादर न केल्यास ते पुढील कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दामोदर नामदेव वाघमारे
२/१४, चंपारत्न नगरी, उदय बाग,
पुणे ४११ ०२३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय दौंड, ता. दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय दौंड, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८१/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. दामोदर नामदेव वाघमारे<br>२/१४, चंपारत्न नगरी, उदय बाग, पुणे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्रतिज्ञापत्र देऊनही कुळ व खंड या नोंदी ७/१२ उताऱ्यावरुन कमी करण्यात आलेल्या नाहीत. त्या कमी कराव्यात अशी मागणी अपीलकर्ता श्री. दामोदर नामदेव वाघमारे यानी केली. ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संदीप प्रभाकर इथापे
सातरा जिल्हा कारागृह वर्ग-२, सातारा शहर पालीस ठाण्याजवळ, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय),
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८६ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०११ |
| | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संदीप प्रभाकर इथापे यानी अन्य व्यक्तीच्या संदर्भातील प्रशिक्षण विषयक कार्यवाहीची माहिती मागितली होती. परंतु त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे ती नाकारल्याचे विहित मुदतीत कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यानी सादर केलेल्या उत्तराच्या प्रतीवरून दिसून येते.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश पानसरे
१४७, शनिवार पेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (कृषी),
पंचायत समिती, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, टाकळी कडेवळीत, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश पानसरे
१४७, शनिवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (कृषी), पंचायत समिती, श्रीगोंदा,
ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर श्रीमती निलम मधुकर कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, टाकळी कडेवळीत, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर
श्री.प्रशांत गोकुळ देवतरणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आवश्यक ती कागदपत्रे दाखल करण्यास अधिकाऱ्यांनी सांगितल्यानंतर ती कागदपत्रे सादर करूनही वारस नोंद केली जात नाही. तीन अर्ज करूनही वारस नोंद का केली नाही, याचे उत्तर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून दिले जात नाही. दिलेली माहिती समाधानकारक नाही.

जन माहिती अधिकारी : दि.१७.७.२००१, दि.१.८.२००६ व दि.२२.१.२००९ अशा तीन तारखांना अपीलकर्त्यांनी वारस नोंदीसंदर्भात अर्ज केले होते. त्यावरील कार्यवाहीबाबतच्या माहिती-मागणीच्या त्यांच्या अर्जावर संपूर्ण स्पष्टीकरणात्मक उत्तर ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतींसह दिले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी खुलाशाच्या स्वरूपाची विचारणा केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिनियमातील कलम २ मधील 'माहिती'च्या व्याख्येत ती येत नाही. तसेच वारस नोंद होणे आवश्यक असल्याचे अपीलकर्त्यांनी लेखी निवेदनातही नमूद केले असून ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ताराचंद शंकरराव पवार
१७६, औंधगाव, पुणे-४११००७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विपराव सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
५२-बी, पुणे विद्यापीठ, सेवक वसाहत, औंध, पुणे-४११००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे प्रतिनिधी श्री.यु.एस.मधाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.ताराचंद शंकरराव पवार यानी मागितलेली माहिती सहकारी गृहनिर्माण संस्थकडील असून संस्थेल शासनाने जागा दिली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे. त्यामुळे माहिती देण्याबाबत संस्थेला कळविले. आमच्या कार्यालयाकडे असलेली माहिती श्री.पवार यानी

वेळोवेळी केलेल्या अर्जानुसार त्याना दिली. संस्थेकडील माहिती मिळाली नसल्याची त्यांची तक्रार आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री.यु.एस.मधाळे यानी सादर केले.

श्री.पवार याना विपराव सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, ५२-बी, पुणे विद्यापीठ, सेवक वसाहत, औंध, पुणे या संस्थेतून कायमस्वरूपी काढून टाकण्यात आले असून त्यानी संस्थेचे दप्तर बेकायदेशीरपणे संस्थेच्या ताब्यात ठेवले आहे व संस्थेचे अध्यक्ष म्हणून ते पत्रव्यवहार बेकायदेशीरपणे करीत असतात. या संदर्भात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मावळ यांच्याकडे वेळोवेळी तक्रार केली आहे. संस्थेच्या सभासदानीही त्याबाबत विविध पातळयावर तक्रारी केल्या आहेत. माहिती मागणीचे अर्ज न करता टपालातून ते कोरे कागद पाठवितात व माहिती न मिळाल्याची तक्रार करतात, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा सचिव, विपराव सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, ५२-बी, पुणे विद्यापीठ, सेवक वसाहत, औंध, पुणे श्री.अशोक लक्ष्मण वाघोले यानी पूरक कागदपत्रासह सादर केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे. तथापि अपीलकर्ता व संस्था यांच्यातील परस्परांविरूध्दच्या तक्रारी लक्षात घेता अपीलकर्त्यांनी नेमकी माहिती मागणारा अर्ज अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे व संस्थेच्या दप्तरात असलेली त्यातील माहिती अपिलीय प्राधिकारी यानी प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरविणे, अशी कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्त्याची माहितीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या अधिनियमाच्या कलम २ मध्ये दिलेल्या माहितीच्या संज्ञेनसारुच असली पाहिजे. आयोगाने सुनावणीसाठी दि.९.२.२०११, दि.६.४.२०११, दि.२७.६.२०११ व दि.२२.८.२०११ या तारखा नेमल्या होत्या. यातील एकाही तारखेला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. हे लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती मिळविण्यात स्वारस्य असल्याचे दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या अपिलाची दखल घेण्याचे कारण नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती श्वेता वर्णेकर
परिसर यमुना, आय.सी.एस.कॉलनी,
गणेशखिंड रोड, पुणे ४११ ००७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प),
वाहतुक नियोजन विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
वाहतुक नियोजन विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९६६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती श्वेता वर्णेकर
परिसर यमुना, आय.सी.एस.कॉलनी, गणेशखिंड रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प),
वाहतुक नियोजन विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विजयकुमार संदिपान शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
वाहतुक नियोजन विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. श्रीनिवास बोनाला

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पुण्यातील सायकल ट्रॅक्सची नियोजित/प्रस्तावित लांबी, पूर्ण झालेल्या ट्रॅक्सची लांबी इ. माहिती विशिष्ट तक्त्यांच्या स्वरुपात मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी ३० दिवसांत उत्तर दिले नाही. योग्य माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपील केले असता अपिलानंतर चुकीची माहिती दिली. प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती व दिलेली माहिती यात तफावत असून त्याबाबतची माहिती दोन दिवसांत देण्याचे कबूल करुनही जन माहिती अधिका-यांनी दिली नाही. तसेच या ट्रॅक्सची देखभाल व दुरुस्ती याबाबतचाही नेमका तपशील दिला नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती विशिष्ट नमुन्यात वाहतूक नियोजन विभागाकडे मागितली होती. दि. १३/९/२०१० च्या या अर्जातील माहिती जे.एन.एन.यु.आर.एम. विभागाकडील असल्यामुळे दि. १/१०/२०१० रोजी अर्ज त्या विभागाकडे वर्ग करुन अपीलकर्त्यांना तसे कळविले. विशिष्ट तक्त्याच्या स्वरुपात माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत बंधनकारक नसल्याचे त्या विभागाने अपीलकर्त्यांना दि. १२/११/२०१० च्या पत्रान्वये स्पष्ट केले व त्याबरोबरच माहितीही दिली. अपिलातील आदेशाप्रमाणे पथ विभाग जे.एन.एन.यु.आर.एम. इ.सर्व विभागांकडून माहिती मागवून दिली. ३४ सायकल ट्रॅक्स असून प्रत्यक्ष जागेवर पाहणी व मोजणी करुन संगणकीय नोंदींसह तक्ता तयार करुन द्यावयाचा असल्यामुळे माहिती देण्यास उशीर झाला. सर्व ट्रॅक्सची देखभाल व दुरुस्ती याचाही तपशील दिला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी जानेवारी २००५ ते ऑगस्ट २०१० या काळातील माहिती विशिष्ट नमुन्यात मागितली आहे. मागणीनुसार नमुन्यात माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तरीही त्यानुसार माहिती देण्यात आली आहे. तसेच अपीलकर्त्यांनी 'अर्जात नमूद नसलेल्या नियोजित/प्रस्तावित सायकल ट्रॅक्सचीही माहिती द्यावी',असे म्हटले आहे. अशा प्रकारची ढोबळ विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. तथापि अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेला विषय सार्वजनिक हिताशी संबंधित असल्यामुळे माहिती संकलित करुन देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी तत्परतेने करणे अधिक योग्य ठरले असते. मात्र प्रत्यक्ष जागेवर पाहणी व मोजणी करुन संगणकीय

नोंदींसह विशिष्ट नमुन्यात माहिती तयार करुन देण्यास विलंब झाल्याचे त्यांचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे. तथापि तफावतीबाबतचा स्पष्टीकरणात्मक तपशील जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास ३ दिवसांत पुरवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल उभय बाजूंपैकी कोणीही सादर केलेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माधव शंकर पिसाळ
हल्ली मु.स.नं.२०१२, घर नं.३००/६, काशिनाथ पाटीलनगर,
धनकवडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जावली, तहसील कार्यालय, जावली,
ता.जावली, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जावली, तहसील कार्यालय,
जावली, ता.जावली, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव शंकर पिसाळ
हल्ली मु.स.नं.२०१२, घर नं.३००/६, काशिनाथ पाटीलनगर, धनकवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जावली, तहसील कार्यालय, जावली,
ता.जावली, जि.सातारा श्री.एन.एच.कुंभारे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जावली, तहसील कार्यालय,
जावली, ता.जावली, जि.सातारा श्री.आर.बी.देगावकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : नोव्हेंबर १९८५ मध्ये श्रीमती पार्वतीबाई दत्तात्रय पिसाळ यांचे निधन झाले, वारस म्हणून पुरावे जोडून आम्ही नोंदीची मागणी केली होती. त्याबाबत तक्रार आल्यानंतर मंडल अधिकाऱ्यानी वारस प्रकरणी निकाल दिला. परंतु तिघापैकी नेमका वारस कोण याची लेखी पुराव्यानिशी माहिती दिली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : वारस रजिस्टरच्या संदर्भतील विचारणा अपीलकर्त्यानी केली हाती. माहिती अभिलेखात न आढळल्यामुळे अपीलकर्त्याना कळवून मुदत मागितली. नंतर माझी तेथून बदली झाली.

विद्यमान जन माहिती अधिकारी : सन १९८५ मधील हा नोंदीचा विषय असून कागदपत्रे शोधण्यासाठी दोन कर्मचाऱ्यांचे पथक नेमले आहे. परंतु अद्याप कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत.

अपिलीय प्राधिकारी : संबंधित मिळकतीला आपले नाव लागावे अशी आपली मागणी असून प्रांत कार्यालयाने त्यांचे अपील फेटाळले आहे. सन १९४० पूर्वीपासूनची कागदपत्रे या संदर्भात तपासणे आवश्यक असून त्यानंतरच अपीलकर्त्यानी वारस नोंदीबाबत अपील केल्यास पुढील निर्णय घेता येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अपीलकर्त्यास सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती १५ दिवसांत नि:शुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१५.९.२०११ पर्यंत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जावली, तहसील कार्यालय, जावली, ता.जावली, जि.सातारा यानी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. केरु खंडु आबनावे
मु. पो. कानगांव, ता.दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती दौंड, ता. दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पाटस, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ०७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ व दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. केरु खंडु आबनावे
मु. पो. कानगांव, ता.दौंड, जि. पुणे (दि. २७/६/२०११ )

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. मारुती नारायण इंगळे (दि.२२.८.२०११)

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पाटस, ता. दौंड, जि. पुणे श्री. सुधीर तुकाराम नेपते (दि.२२.८.२०११)

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. केरु खंडु आबनावे यानी तालुक्यातील सर्व जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पत्ते इ. माहिती मिळाली नसल्याची व नंतर काही माहिती विलंबाने दिल्याची तक्रार दि. २७/६/२०११ रोजी आयोगापुढील सुनावणीत केली.

अपीलकर्त्यांनी ग्रामपंचायतीकडे दि. १९/१२/२००९ रोजी व पंचायत समितीकडे दि. २८/१/२०१० रोजी अर्ज करुन माहिती मागितली. दौंड तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पत्ते, दूरध्वनी क्रमांक इ. माहिती संकलित करुन दिली. असन्य माहिती सरसकट व संदिग्ध स्वरुपात मागितली असून ती आमच्याकडे नाही, त्यामुळे देणे शक्य नाही. अपीलकर्ता वारंवार अशा प्रकारचे अर्ज करुन माहिती मागत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पाटस, ता. दौंड, जि. पुणे श्री. सुधीर तुकाराम नेपते व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. मारुती नारायण इंगळे यांनी केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी ढोबळ मानाने, संदिग्ध स्वरुपात व निरर्थक अशा स्वरुपाची विचारणा अनेक मुद्दयांमध्ये (उदा. मुद्दा क्र.२, ३,४) केली आहे. माहितीच्या अधिकाराचा हा योग्य वापर नाही. त्या त्या आस्थापनेतील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असते. आवश्यक असल्यास त्या त्या आस्थापनेकडील माहिती अपीलकर्त्यांनी करुन घ्यावी. सरसकट स्वरुपात ती संकलित करुन देणे कोणत्याही जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. त्यामुळे अशा प्रकारची मागणी करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती याचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. लक्ष्मीकांत पंडितराव जेडगे पाटील
एम ९६, रा. महेशनगर, विडी घरकुल,
अे ग्रुप समोर, हैद्राबाद रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती , सोलापूर,
श्री सिध्देश्वर बाजारपेठ, हैद्राबाद रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५३/२०१०/सोलापूर + १९२१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. लक्ष्मीकांत पंडितराव जेडगे पाटील
एम ९६, रा. महेशनगर, विडी घरकुल, अे ग्रुप समोर, हैद्राबाद रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यांचे प्रतिनिधी
श्री. विद्याधर भि. माने

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती , सोलापूर,
श्री सिध्देश्वर बाजारपेठ, हैद्राबाद रोड, सोलापूर श्री. धनराज विश्वनाथ कमलापुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- (अपील क्र. १९२१) - सन २००८-२००९ ते २०१०-२०११ या वर्षी परवानाधारक स्त्री-पुरुष हमाल, तोलार आदि संदर्भातील माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालय यांचेकडे मागितली होती. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीला शासनाचे अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ लागू होत नसल्याचे, माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्णयाच्या आधारे कळवून जन माहिती अधिकारी यानी माहिती नाकारली. माहिती मिळावी.

अपीलकर्ता व मूळ प्रकरणातील जन माहिती अधिकारी - (अपील क्र. १८५३) - माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कृषी उत्पन्न बाजार समित्यांना लागू नसल्याचा निर्णय आयोगाने दिला असल्यामुळे, व माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिल्यामुळे त्यांच्याविरुध्द अपील केले आहे. मात्र अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार हमालांची यादी तयार असून ती देत आहोत.

अपिलीय प्राधिकारी- कृषी उत्पन्न बाजार समितीने माहिती देणे आवश्यक होते. ८ दिवसांत माहिती द्यावी, असे असे आदेश दिले होते.

कृषी उत्पन्न बाजार समितीला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय आयोगाने दिला असला तरी या समित्या राज्य विधी मंडळाने स्वतंत्र कायद्यान्वये निर्माण केलेल्या आहेत. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (२)(ग) मधील तरतुदीनुसार उक्त अधिनियम त्यांना लागू होते, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ५६६६/२००७ प्रकरणी दिला असल्यामुळे माहिती देणे कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर बंधनकारक आहे. सबब आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:

## आदेश

१) अपील क्र. १९२१/२०१० मान्य करण्यात येत आहे.
२) अपील क्र. १८५३/२०१० अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. घननीळ नामदेव भोसले
कुमठा नाका, श्रीरामनगर, प्लॉट नं. ७,
यशवंत हौ. सोसायटी लगत, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पोलिस अधीक्षक,
सोलापूर ग्रामीण, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
पंढरपूर विभाग, पंढरपूर , जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. घननीळ नामदेव भोसले
कुमठा नाका, श्रीरामनगर, प्लॉट नं. ७,
यशवंत हौ. सोसायटी लगत, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
पंढरपूर विभाग, पंढरपूर , जि. सोलापूर डॉ. डी. एस. स्वामी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सहाय्यक पोलिस उप निरीक्षक श्री. गु. सो. कांबळे यांच्या आठवडा डायरीमधील तारखा अस्पष्ट असून नोंदी पूर्ण व खऱ्या नाहीत. काही भाग मुद्दाम कोरा ठेवलेला आहे.त्यामुळे दिलेली माहिती खोटी व चुकीची आहे.

जन माहिती अधिकारी- आठवडा डायरीमध्ये संबंधित अधिका-यांनी खोटी नोंद केली, असे अपीलकर्त्यांच म्हणणे आहे.

अपीलकर्त्यांचा मूळ अर्ज विचारात घेता भाष्य करुन तक्रार केली आहे व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अतर्गत येत नाहीत. तथापि संबंधित नोंदी व वस्तुस्थिती याबाबतची सत्यता पडताळून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर , जि. सोलापूर डॉ. डी. एस. स्वामी यानी अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दूरध्वनीवरुन स्मरण देऊनही डॉ. डी. एस. स्वामी यानी असा अहवाल सादर केलेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर , जि. सोलापूर डॉ. डी. एस. स्वामी दि. २५/९/२०११ पर्यंत अहवाल सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रोहिदास काळुराम रासकर
मु. खळद, ता. पुरंदर, जि. पुणे ४१२ ३०१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ०७/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. देवदत्त गो. ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. विश्वनाथ सोमा विरणक

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वाळू काढून विकल्याच्या संदर्भातील काही प्रकरणांमधील चौकशीतील कागदपत्रांच्या प्रतींची मागणी श्री. रोहिदास काळुराम रासकर यानी केली होती. संबधित प्रकरणात दंड आकारण्यात आला होता. मात्र ही कागदपत्रे सन २००६ ची असून 'ड' वर्गातील असल्यामुळे नष्ट करण्यात आली आहेत. त्यामुळे उपलब्ध होत नाहीत. ती उपलब्ध होत नसल्याचे अपीलकर्त्यास कळविले होते, असे प्रतिपादन जन माहिति अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. विश्वनाथ सोमा विरणक व अपिलिय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. देवदत्त गो. ठोंबरे यांनी सांगितले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणेः

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नितीन वेल्हेकर
३२२, एम.जी. रोड, फलॅट नं. ४, पहिला मजला,
बुधाणी वेफर्सजवळ, बॉम्बे स्वदेशी स्टोअर्स,
कॅम्प, पुणे ४११ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक,
जुने जकात घर तळमजला, डी. डी. इमारत,
शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई २३

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक,
जुने जकात घर तळमजला, डी. डी. इमारत,
शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई २३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ०९/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक,<br>जुने जकात घर तळमजला, डी. डी. इमारत,<br>शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई श्री. वसंत ठा. मिस्त्री | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, मुंबई शहर क्र. १ मध्ये नोंदविलेल्या दोन दस्तांच्या संदर्भातील मुद्रांक शुल्क चुकविल्या प्रकरणाच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री. नितीन वेल्हेकर यानी दि. २८/९/२०१० च्या अर्जान्वये (प्राप्त दि. ४/१०/२०१०) मागितल्या होत्या. रु. २५६/- शुल्क भरण्यास किंवा समक्ष येऊन स्वखर्चाने छायांकित प्रती घेऊन जाण्यास दि. ८/१०/२०१० च्या पत्रान्वये त्याना यु.पी.सी.ने कळविले. शुल्क न भरता त्यानी अपील केले. त्यावर दि. २२/११/२०१० रोजी रजिस्टर टपालाद्वारे त्याना पुन्हा शुल्काबाबत कळविले. तरीही त्यानी शुल्क भरलेले नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक, जुने जकात घर तळमजला, डी.डी. इमारत, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई श्री. वसंत ठा. मिस्त्री पूरक कागदपत्रांसह यानी केले.

वरील निवेदन हे लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती हवी असल्यास शुल्क भरुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. शुल्क न भरता, माहिती न मिळाल्याच्या तक्रारीसाठी अपील करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मनोजकुमार साहेबराव बोरसे
आशिर्वाद कॉलनी, तलाठी कार्यालयाजवळ,
मंगलमूर्ती हॉस्पिटल समोर, रहाटणी, पुणे ४११ ०१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अवर सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,
चौथा मजला, मुंबई ४०० ०३२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार भवन,
चौथा मजला, मुंबई ४०० ०३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५९/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मनोजकुमार साहेबराव बोरसे
आशिर्वाद कॉलनी, तलाठी कार्यालयाजवळ,
मंगलमूर्ती हॉस्पिटल समोर, रहाटणी, पुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आजी/माजी सैनिक, त्यांचे पाल्य, पत्नी/विधवा याना शैक्षणिक आरक्षण देणाऱ्या परिपत्रकाची सांक्षाकित प्रत उच्च व तंत्र शिक्षण विभाग (विद्यापीठ शिक्षण), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती. मूळ विषय शालेय शिक्षण विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागाकडे अर्ज पाठविल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. संबंधित शासन निर्णय व परिपत्रक आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध होत नसल्याचे शालेय शिक्षण क्रीडा विभागाचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. आजी/माजी सैनिक, त्यांचे पाल्य, पत्नी/विधवा यांच्या संदर्भात महत्त्वाचा विषय असल्यामुळे याबाबत मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मनोजकुमार साहेबराव बोरसे यानी केले.

अपीलकर्त्यांनी मांडलेल्या विषयाचे स्वरुप लक्षात घेता संबंधित शासन निर्णय व परिपत्रक याची प्रत शासनाकडे उपलब्ध नसल्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभाग (विद्यापीठ शिक्षण), मुंबई यांच्या जन माहिती अधिका-यानी कळविणे योग्य नाही. संबंधित माहिती अपीलकर्त्यांना त्यानी उपलब्ध करुन द्यावयास हवी होती.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार शासननिर्णय व परिपत्रकाच्या प्रती अपीलकर्त्यास शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यानी करावी व तसा अनुपालन अहवाल दि. २५/९/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोविंद कुंडलीक थोपटे
मु.पिंपरे खुर्द (थोपटेवाडी), पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता.पुरंदर(सासवड), जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, पिंपरे खुर्द विकास सेवा सहकारी
संस्था मर्यादित, पिंपरे खुर्द, ता.पुरंदर(सासवड), जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.गोविंद कुंडलीक थोपटे<br>मु.पिंपरे खुर्द (थोपटेवाडी), पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

या अपिलाची सुनावणी दि.१०.५.२०११ रोजी घेण्यात आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे हजर होते. परंतु अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.२२.८.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीला जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे गैरहजर होते.

अपीलकर्ता : पिंपरे खुर्द विकास सेवा सहकारी संस्था मर्यादित, पिंपरे खुर्द, ता.पुरंदर(सासवड), जि.पुणे या संस्थेकडील माझ्या नावे दाखविलेल्या कर्जाच्या अनुषंगाने सन २००० ते २००७ या

कालावधीतील माहिती संस्थेकडे मागितली होती. परंतु संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी कळविले. संस्थेला शासनाकडून कर्जमाफीची सवलत मिळते. अन्य अनुदान वा अर्थसहाय्य मिळते की नाही, हे माहित नाही.

जन माहिती अधिकारी : संस्थेला शासनाकडून अर्थसहाय्य वा अनुदान मिळत नाही. तरीही अपीलकर्त्यांना माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार अपीलकर्त्यांना माहिती दिली.

अपिलीय प्राधिकारी : संस्थेने दिलेली माहिती चुकीची, तसेच अपूर्ण असल्याची अपीलकर्त्याची तक्रार होती. १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार संस्थेने माहिती दिली.

संबंधित संस्थेला भरीव शासकीय अनुदान व अर्थसहाय्य मिळत नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही. त्याबाबतचे पुरावे अपीलकर्त्यांनी सादर केलेले नाहीत. मात्र माहिती दिल्याचे संस्थेचे व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अंगद नरहरीराव भोसले
सर्व्हे नं. ५३/५८, साईनाथनगर,
वडगांव शेरी, पुणे ४११ ०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अंगद नरहरीराव भोसले
सर्व्हे नं. ५३/५८, साईनाथनगर, वडगांव शेरी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी श्री. अशोक देवकरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी श्री. विलास ढवळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका शाळेच्या कायम विनाअनुदानित तत्तवावरील मान्यतेच्या मूळ प्रस्तावाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले नाही, व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. अद्याप माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी -अपीलकर्त्यांनी मागितलेल्या प्रस्तावाची प्रत मुख्याध्यापकां-कडे असते म्हणून अपीलकर्त्यांच्या अर्जानुसार माहिती देण्यासाठी संबंधित मुख्याध्यापकांना कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता हजर राहिले नाहीत, म्हणून अर्ज निकाली काढला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती-मागणीचा अर्ज संबंधितांकडे वर्ग केल्याची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास ८ दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी श्री. एस.एस.वाघमारे यानी जन माहिती अधिकारी डॉ. जयश्री गोरे यांना कळविले. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती खाजगी शाळेच्या संदर्भात असून या संचिका आपल्या कक्षेतील नसल्याचे व संबंधित विषयात आपण जन माहिती अधिकारी नाही, असा खुलासा श्री. पी.एम. थोरवटे, कक्ष अधिकारी, तथा जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. नांदेड यांनी दि. १३/५/२०१० च्या पत्रान्वये केला. ते लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी यानी योग्य त्या जन माहिती अधिकाऱ्यांना सूचना देऊन अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्त्यांच्या मागणीत सार्वजनिक हिताचा संदर्भ काय आहे, हे त्यांचे निवेदन व कागदपत्रे यावरुन स्पष्ट होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड श्री. एस. एस. वाघमारे यानी योग्य त्या जन माहिती अधिकाऱ्यांना सूचना देऊन अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरवावी व दि. २०/९/२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परशुराम एम.दिवानंद
हाऊस नं.३०२, तिसरा मजला, द्वारा-अमोल होले,
दिवाणजी सहकारी हौसिंग सोसायटी, गोकुळनगर, कोंढवा बुद्रुक, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र.४,
पुणे शहर, येरवडा, पुणे-४११००६ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग,
पुणे शहर, वानवडी, पुणे-४११०४०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र.४,
पुणे शहर, येरवडा, पुणे प्रतिनिधी श्री.एम.आर.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग,
पुणे शहर, वानवडी, पुणे श्री.व्ही.टी.पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुण्याच्या पोलीस आयुक्तांकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात कारवाई करून त्याबाबतची माहिती द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.परशुराम एम.दिवानंद यानी केली होती. परंतु त्यानी नमूद केलेल्या तारखांचे अर्ज आढळत नाहीत. अपीलकर्त्याचा बंडगार्डन पोलीस ठाण्याकडील अर्ज पुढील चौकशीसाठी व

कार्यवाहीसाठी वानवडी पोलीस ठाण्याकडे पाठविल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी म्हटले असले तरी हे कागदपत्र आढळत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे शहर, वानवडी, पुणे श्री.व्ही.टी.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र.४, पुणे शहर, येरवडा, पुणे प्रतिनिधी श्री.एम.आर.कुलकर्णी यानी केले. अपिलीय प्राधिकारी यांच्या तशाच आशयाचे लेखी निवेदनही त्यांचे प्रतिनिधी श्री.एम.आर.कुलकर्णी यानी सादर केले.

अपीलकर्त्यांनी केलेल्या अर्जाची परिमंडळ-२ मध्ये नोंद आहे की नाही, याची तपासणी करून जन माहिती अधिकारी यानी अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु असा अहवाल आयोगाला अद्याप प्राप्त झालेला नाही. तो त्वरित सादर केला जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दि.२५.९.२०११ पर्यंत अहवाल सादर न केल्यास जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे शहर, वानवडी, पुणे श्री.व्ही.टी.पवार कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब पंढरीनाथ दौंडकर
मु.पो.राजगुरूनगर(खेड), जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन
महामंडळ, स्वारगेट,पुणे-४११०३७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक डेपो मॅनेजर, पुणे महानगर परिवहन
महामंडळ, स्वारगेट,पुणे-४११०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळासाहेब पंढरीनाथ दौंडकर
मु.पो.राजगुरूनगर(खेड), जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन
महामंडळ, स्वारगेट,पुणे श्री.त्रिंबक श्रीपाद धारूरकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक डेपो मॅनेजर, पुणे महानगर परिवहन
महामंडळ, स्वारगेट,पुणे श्री.नितीन रामचंद्र घोगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : एस.टी.बसेसना आकारल्या जाणाऱ्या टोलबाबतची व वैध पास असतानाही रस्ता वापराचा टोल स्वतंत्रपणे न काढल्यास दंड आकारता येतो का, या संदर्भातील माहिती मागितली होती. दोन्ही अर्जाबाबत तिसाव्या दिवशी शुल्क भरून घेऊन माहिती देण्यात आली. वस्तुतः विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यानी पूर्ण माहिती न दिल्यामुळे निःशुल्क देणे आवश्यक होते. माहिती संदिग्ध व शेवटच्या दिवशी पत्र पाठवून दिली जाते.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांच्या दि.९.७.२०१० रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार शुल्क भरून माहिती घेण्याबाबत दि.२.८.२०१० च्या पत्रान्वये कळविले. हे पत्र मिळाले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. परंतु दि.७.८.२०१० रोजी महामंडळाच्या कार्यालयात ते समक्ष आले असता शुल्क भरून त्यानी माहिती स्वीकारली. जन माहिती अधिकारी १७ दिवस इस्पितळात दाखल असल्यामुळे व त्यांच्याकडे अन्य दोन विभागांचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे प्रथम अपिलाची सुनावणी ४५ दिवसांच्या विहित मुदतीत होऊ शकली नाही. नंतर झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यांशी झालेल्या सविस्तर चर्चेनुसार त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्वरित उपलब्ध करून देण्यात आल्या. उशीर झालेला नाही. ‘माहिती मिळाली, तक्रार नाही,’ असे त्यानी तेव्हा लेखीही दिले आहे.

अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्रांच्या जावक बारनिशीतील नोंदीच्या प्रतीसह पूरक कागदपत्रे जन माहिती अधिकारी यानी सादर केली.

नियमापेक्षा जास्त प्रमाणात टोलची रक्कम वसूल केली जात असल्याची तक्रार असल्याचे अपीलकर्त्यांनी नमूद केले. परंतु ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी  यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मेहमूद शेख
प्लॉट नं.१५४, संजय गांधी सोसायटी, सोमनाथनगर, वडगांव शेरी, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती,
साबु सिध्दिक मुसाफिरखाना, मुंबई-४०० ००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती,
साबु सिध्दिक मुसाफिरखाना, मुंबई-४००००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७११ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.८.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मेहमूद शेख
प्लॉट नं.१५४, संजय गांधी सोसायटी,
सोमनाथनगर, वडगांव शेरी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती,
साबु सिध्दिक मुसाफिरखाना, मुंबई प्रतिनिधी श्री.मोहम्मद वसीम

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती,
साबु सिध्दिक मुसाफिरखाना, मुंबई श्री.मोहम्मद वसीम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : हज योत्रेच्या संदर्भात निवड केलेल्या व्यक्तींच्या संदर्भातील माहिती अपुरी दिली. त्यातील अनेक बाबी न पटणाऱ्या आहेत. ज्या लोकांची निवड केली त्यांची नावे व कारणे दिली नाहीत. जन माहिती अधिकाऱ्यांच्या संपर्कातील व्यक्तींचीच निवड करण्यात अली असून शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे निवडीची व प्रशिक्षणाची कार्यवाही केलेली नाही. तसेच संबंधित परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध असणे आवश्यक असूनही दिलेले नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी तीन वर्षांमधील माहिती मागितली होती. ती दिली. ज्या व्यक्तींची हज यात्रेसाठी निवड केली जाते त्याबाबतचे अभिलेख जतन केले जातात. कोणतीही माहिती लपविलेली नाही. अपीलकर्ता म्हणतात ते परिपत्रक मायनॉरिटीज डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. कारणे, खुलासा अशा स्वरूपाची विचारणा, तसेच कार्यवाही नियमाप्रमाणे केली आहे की नाही, याबाबतचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. अपीलकर्ता याना आवश्यक असल्यास संबंधित अभिलेख जन माहिती अधिकाऱ्यानी अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत व त्यातील हव्या असलेल्या कागदपत्रांची नेमकी लेखी मागणी अपीलकर्त्यांनी केल्यास त्यानुसार योग्य ते शुल्क आकारून प्रती पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानदेव भाऊराव काटे
मु. पो. निमगांव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत निमगांव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ज्ञानदेव भाऊराव काटे
मु. पो. निमगांव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०४

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. आय.एम.शेलार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत निमगांव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. रमेश रामभाऊ चौरे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. के. बी. फाकटकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - मु. पो.निमगाव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे येथील मिळकतीचा नमुना नं. ८ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे फोटोसह उतारे देण्याची मागणी केली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी फोटो दिले नाहीत कारण खोटया नोंदी केल्यामुळे संदिग्ध माहिती दिली जात आहे. उता-यातील वर्णनाप्रमाणे मिळकत असल्यास फोटो काढून का दिला जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> - अपीलकर्त्यांच्या दि. ७/७/२०१० च्या अर्जाला दि. ३०/७/२०१० व दि. १८/८/२०१० रोजी उत्तर दिले. मिळकतीचे फोटो ग्रामपंचायतीकडे नसतात असे स्पष्ट कळवून माहिती दिली.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (२) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती' च्या संज्ञेत येत नाही. जन माहिती अधिकारी यानी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कलगोंडा आण्णा पाटील
मु.पो.जैनापूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा महसूल उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
**(२)अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ, तहसील कार्यालय,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**(१)जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
**(२)जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, तहसील कार्यालय,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०७+२५६३+२३३९ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कलगोंडा आण्णा पाटील
मु.पो.जैनापूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा महसूल उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती सुनंदा गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आरटीएस प्रकरणातील निकालात सन १९९६ व १९९८ मधील दिवाणी न्यायालयातील दाव्याचा उल्लेख आहे. त्याच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु ती माहिती मिळाली नाही व संचिकेत माहिती नसताना माहिती दिल्याचे म्हटले आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.कलगोंडा आण्णा पाटील यानी केले.

अपीलकर्ता यानी दि.१८.२.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली कागदपत्रे उपलब्ध होत नव्हती व तसे त्याना दि.२५.२.२०१० च्या पत्रान्वये कळविले. उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी उपविभाग व तहसीलदार, शिरोळ यांच्याकडील प्रकरणांमधील कागदपत्रे (फेरफार क्र.१०३९बाबत) मागितली असता अपीलकर्त्यांना हव्या असलेल्या प्रती त्यात उपलब्ध झाल्या व त्या देण्यात आल्या, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती एन.एस.शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा महसूल उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती सुनंदा गायकवाड यानी सादर केले.

एकाच विषयाच्या अनुषंगाने अपीलकर्ता विविध स्वरूपाची माहिती मागणारे अर्ज करीत असून त्यात सार्वजनिक हिताचा संबंध नाही. तथापि माहिती मिळविण्यासाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी प्रयत्न केल्याचे दिसून येते. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकेचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपती मनोहर दळवी
३४७/७, रेव्हेन्यू कॉलनी, कराड, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कराड,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५२ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.सु.ल.मोरे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.दिगंबर नाथा भांदुर्गे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.दिगंबर नाथा भांदुर्गे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा

अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.सु.ल.मोरे यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपीलकर्त्याची टपालाची पोहोच त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रविंद्र मुरलीधर कदम
एस.टी.अधिकारी निवास, बिल्डिंग नं.२, अपीलकर्ता
ब्लॉक नं.३, शंकरशेठ रोड, स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड जवळ,
स्वारगेट, पुणे- ४११ ०३७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक (कव औ सं),
कर्मचारी वर्ग खाते, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई- ४०० ००८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कर्मचारी वर्ग अधिकारी,
सेवामंडळ, कर्मचारी वर्ग खाते,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई- ४०० ००८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रविंद्र मुरलीधर कदम
एस.टी.अधिकारी निवास, बिल्डिंग नं.२,
ब्लॉक नं.३, शंकरशेठ रोड, स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड जवळ, स्वारगेट, पुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

खाते अंतर्गत बढती समितीसमोर माझ्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाची सन २००३ मधील माहिती पूर्वी मागितली होती. ती मला देण्यात आली होती. आता सन २००८ मधील माहिती मागितली असता दिली नाही. ही माहिती उघड झाल्यास अपिलीय प्राधिकारी बाधित होतील, म्हणून माहिती दिली जात नाही. संबंधित प्रकरणातील कार्यवाही प्रलंबित असल्याचे जन माहिती अधिकारी यानी दि. ४/६/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले होते. परंतु कार्यवाही पूर्ण होऊनही आता ८ महिने झाले आहेत. त्यामुळे मला माहिती दिली पाहिजे असे अपीलकर्ता श्री. रविंद्र मुरलीधर कदम यानी निवेदन केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी आयोगाची पूर्व परवानगी घेऊन अनुपस्थित होते.

अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती गोपनीय नाही तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम (८) मधील माहिती देण्यास अपवादाच्या तरतुदींमध्ये समाविष्ट होत नाही. कार्यवाही चालू असताना माहिती नाकारणे योग्य असले, तरी आता संबंधित प्रकरणातील कार्यवाही पूर्ण झाली असल्यामुळे माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास संबंधित माहिती निःशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल दि. २५/९/२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नागेश्वर चंदनराव नायडू
गाळा नं. १०, मार्केट यार्ड,
पोलिस वायरलेस कॉलनी, चव्हाणनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
बिनतारी संदेश, अप्पर पोलिस महासंचालक व संचालक बिनतारी संदेश,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** गृह पोलिस निरीक्षक,
बिनतारी संदेश, अप्पर पोलिस महासंचालक व संचालक बिनतारी संदेश,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
बिनतारी संदेश, अप्पर पोलिस महासंचालक व संचालक बिनतारी संदेश,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. डी. डी. पवार

**जन माहिती अधिकारी** तथा गृह पोलिस निरीक्षक,
बिनतारी संदेश, अप्पर पोलिस महासंचालक व संचालक बिनतारी संदेश,
महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. संजय तानाजी हांडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# **विवेचन**

मार्केटयार्डच्या गाळयांमध्ये अपीलकर्त्यांचा गाळा असून शेजारी असलेली अन्य व्यक्तीची भाडेतत्त्वावरील जागा आच्छादित केल्या संदर्भात अपीलकर्ता श्री. नागेश्वर चंदनराव नायडू यांची तक्रार आहे. संबंधित मोकळी जागा बेकायदेशीरपणे झाकण्यात आली असल्याची व बांधकाम अनधिकृत असल्याची त्यांची तक्रार असून कारवाई करण्याची त्यांची मागणी आहे. याबाबतच्या त्यांच्या दि. १२/७/२०१० च्या अर्जानुसार मागितलेली माहिती दि. ६/८/२०१० च्या पत्रानुसार मुद्देनिहाय दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गृह पोलिस निरिक्षक, बिनतारी संदेश, अप्पर पोलिस महासंचालक व संचालक बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. संजय तानाजी हांडे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून त्यांच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राम भगवान लांडगे,
व्दारा श्री. शामराव चंदराव खवते, सर्व्हे नं. ४४८१,
प्लॉट नं. ११, कॉर्पोरेशन शाळेजवळ, गुरव पिंपळे, पुणे २७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ७
दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा समादेशक सहाय्यक,
राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ७, दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. राम भगवान लांडगे,
व्दारा श्री. शामराव चंदरराव खवते, सर्व्हे नं. ४४८१,
प्लॉट नं. ११, कॉर्पोरेशन शाळेजवळ, गुरव पिंपळे, पुणे २७

**अपिलीय प्राधिकारी** तथा राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ७
दौंड, जि. पुणे श्री. अशोक कचरु गौड

**जन माहिती अधिकारी** तथा समादेशक सहाय्यक,
राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ७, दौंड, जि. पुणे श्री. सिध्देश्वर गोपाळ कोची

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपिलाची सुनावणी दि.२९/६/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि. २२/८/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माझ्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवानिवृत्तीचे लाभ प्रदान करण्यात आले, मात्र मला जाणूनबुजून द्वेष भावनेने अशा लाभांपासून वंचित ठेवण्यात आले. रजा विनावेतन केली व त्याची रक्कम वसूल केली. त्याची गणती कशा प्रकारे केली, रजेचे वेतन ४ वर्षांनी देण्याला जबाबदार कोण, याची माहिती ३ अर्जांनंतरही मुदतीत व पूर्ण मिळत नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता श्री. राम भगवान लांडगे यांना सेवेतून बडतर्फ करुन सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने त्यानी केलेल्या आधीच्या दोन अर्जांना विहित मुदतीत उत्तर देऊन शुल्क कळविले, व माहिती दिली. त्याच स्वरुपाची माहिती त्यानी तिसऱ्या अर्जाद्वारे मागितली होती. त्याला उत्तर देण्यास विलंब झाला. आमच्या कार्यालयाला एकूण १७ मंत्रालयीन कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून प्रत्यक्ष ७ कर्मचारीच कार्यरत आहेत. तरीही ५ वर्षांपूर्वीची माहिती शोधून अपीलकर्त्यांना वेळोवेळी पुरविली आहे. तरी वारंवार त्याच त्याच माहितीसाठी अर्ज करुन श्री. लांडगे कार्यालयास वेठीस धरत आहेत, व शासकीय कामात जाणून बुजून अडथळा आणत आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी व संबंधित लिपिक यांचा श्री. लांडगे यांच्या तिसऱ्या अर्जावरील कार्यवाही- बाबतचा खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अे.के.गौड व वरिष्ठ श्रेणी लिपिक श्रीमती अे. व्ही. शितोळे यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर दामोदर कातुर्डे
१२३, पहिला मजला, खो. नं. १२, पौड रोड,
एम. आय. टी. कॉलेज जवळ, रामबाग कॉलनी,
कानिफनाथ सोसायटी, पुणे- ४११ ०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय उपआयुक्त,
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, धर्मादाय भवन,
वरळी, मुंबई ४०० ०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
धर्मादाय उपआयुक्त यांचे कार्यालय,
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, धर्मादाय भवन,
वरळी, मुंबई ४०० ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा
धर्मादाय उपआयुक्त यांचे कार्यालय, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
धर्मादाय भवन, वरळी, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.अ.पा.सरोदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपिलाची सुनावणी दि.२९/६/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि.२२/८/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता व अपिलिय प्राधिकारी अनुपस्थित होते.

आखिल भारतीय वडार समाज संघ, मुंबई या संस्थेला १०८ एकर जमीन नवी मुंबई येथे महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात आली असल्याचे अपीलकर्ता श्री. प्रभाकर दामोदर कातुर्डे यांचे म्हणणे आहे व त्या बाबतची माहिती विविध अर्जांद्वारे ते मागत असतात. परंतु अशा प्रकारची कोणतीही नोंद अभिलेखात नाही. त्यानी मागितलेल्या, तसेच अशी नोंद ज्यात असते त्या शेडयुलची एक प्रत अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार त्याना पाठविली. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते, असे प्रतिपादन सहा. जन माहिती अधिकारी, धर्मादाय उपआयुक्त यांचे कार्यालय, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, धर्मादाय भवन, वरळी, मुंबई श्री. स. वि. ठाकूरदेसाई यानी पूरक कागदपत्रांसह केले.

माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. यशवंत ग. सरवदे
४८/२, धनलक्ष्मी सोसायटी, वडगावशेरी, पुणे

अपीलकर्ता

२. श्री.परशुराम म. गंगानोर
१२२, सावित्रिबाई फुले वसाहत,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०३०.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सिंचन भवन, पुणे ४११ ०११

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सिंचन भवन, पुणे ४११ ०११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सिंचन भवन, पुणे श्री. भाऊसाहेब चंद्रकांत कुंजीर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सिंचन भवन, पुणे श्री.शामराव तुकाराम जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री. भा. कुंजीर हे महाराष्ट्र शासनाच्या सेवेत रुजू झाल्यापासून आतापर्यंतच्या त्यांच्या मालमत्तेच्या विवरणपत्रासह विविध स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही व अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. अशा कारणावरुन अपीलकर्ता श्री. यशवंत ग. सरवदे व श्री. परशुराम म. गंगानोर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्त्यांच्या विचारणेनुसार श्री. भा. कुंजीर अशी व्यक्ती कार्यरत नाही. मात्र श्री. भाऊसाहेब चंद्रकांत कुंजीर हे अधीक्षक अभियंता आहेत. तरीही अपीलकर्त्यांचा दि.३०/७/२०१० च्या अर्जाला दि. ७/८/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर पाठविले, व अनेक मुद्दे स्पष्ट होत नसल्याने तसे कळविले. कळविलेले शुल्क न भरता व मुदत संपण्याआधीच अपीलकर्ता यानी अपील केले. त्यामुळे त्यांचे अपील फेटाळले. त्यानंतर अपीलकर्त्यांनी कार्यालयात प्रत्यक्ष येऊन माहिती निःशुल्क प्राप्त करुन घेतली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सिंचन भवन, पुणे श्री.शामराव तुकाराम जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सिंचन भवन, पुणे श्री. भाऊसाहेब चंद्रकांत कुंजीर यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरुपाची व संकलित करुन देणे आवश्यक अशा प्रकारे माहिती मागितली आहे. उदा. मुद्दा क्र. ५ अशी माहिती देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नाही. मुद्दा क्र. ६, ७, व ९ मधील विचारणा सरसकट व संदिग्ध स्वरुपाची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम (२) मधील 'माहिती' म्हणजे काय याचे विवरण लक्षात घेऊन अपीलकर्त्यांनी माहिती मागणी करणे आवश्यक असल्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिनेश विजय मोरे
गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
फ्लॅट नं.अे - ५,वॉर्ड अे, भांगरवाडी, लोणावळा — अपीलकर्ता
ता. मावळ, जि. पुणे ४१० ४००

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दिनेश विजय मोरे
गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
फ्लॅट नं.अे - ५,वॉर्ड अे, भांगरवाडी, लोणावळा
ता. मावळ, जि. पुणे ४१० ४००

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. विनायक वि. कोकरे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्या. भांगरवाडी, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे या संस्थेची इमारत बांधणारे श्री. प्रशांत चंद्रकांत भोईर यानी संस्थेची अधिकृत नोंद होऊनसुध्दा १३ महिन्यांनी संस्था नोंदणी रद्द करण्यासाठी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. परंतु बिल्डरच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी चुकीचा निर्णय घेऊन खोटी माहिती दिली. नियमावली धुडकावून बेकायदेशीर कार्यवाही करणा-या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दिनेश विजय मोरे यानी केली.

अपीलकर्त्यांच्या दि. ५/१०/२०१० च्या अर्जाला दि. ३०/१०/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देऊन माहितीसाठीचे शुल्क कळविले. त्यानी पत्रात माहिती मिळाली नसल्याचे म्हटले असल्याने दि. २९/११/२०१० रोजी पुन्हा माहितीच्या सत्यप्रती पाठविल्या.तसेच अर्जामध्ये अभिप्राय, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा करणारे मुद्दे आहेत. ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याचे कळविले, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. विनायक वि. कोकरे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यास दि. ३०/१०/२०१० रोजी पत्र पाठविल्याच्या जावक नोंदवहीमधील नोंदीची प्रत त्यानी सादर केली.

जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास माहिती दिली आहे. बेकायदेशीर कारवाई, चुकीचे निर्णय आदिंबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपतराव दाजीराम साळुंके
मु. भिगवण (तक्रारवाडी), ता. इंदापूर, जि. पुणे-४१३ १३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय फलटण, ता. फलटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय फलटण, ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०२४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. एम. डी. भोईटे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. गजानन गुरव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपिलाची सुनावणी दि.२९/६/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि. २२/८/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता अनुपस्थित होते.

जमिनीच्या फेरफारासंदर्भातील सन १९९१ ते १९९७ या कालावधीतील कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री. गणपतराव दाजीराम साळुंके यानी मागितल्या होत्या. शोध घेऊनही संबंधित कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्त्यास तसे कळविले. अपिलीय प्राधिकारी यानी पुन्हा विचारणा केल्यानुसार पुन्हा शोध घेऊनही कागदपत्रे आढळलेली नाहीत. ही कागदपत्रे अभिलेख वर्गवारीनुसार 'ब' वर्गातील असून ३० वर्षे जतनाची आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. गजानन गुरव यानी केले.

संबंधित कागदपत्रांच्या जतनाची जबाबदारी असणाऱ्या तत्कालीन कर्मचाऱ्यांना याबाबत विचारणा करुन विशेष पथकाद्वारे पुन्हा शोध घेण्यात यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मुकुंद सदाशिव गोरे
समर्थ भारत व्यासपीठ,
१३६०, शुक्रवार पेठ, नातूबाग, पुणे तक्रारकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (महसूल)
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, विधानभवन, पुणे ४११ ००१
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
पुणे विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, विधानभवन, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ३९/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**तक्रारकर्ता-** श्री. मुकुंद सदाशिव गोरे
समर्थ भारत व्यासपीठ, १३६०, शुक्रवार पेठ, नातूबाग, पुणे
यांचे प्रतिनिधी सौ. शिल्पा बेळे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
पुणे विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,
विधानभवन, पुणे श्री.वैभव विठ्ठलराव नावडकर/ श्रीमती पल्लवी घाटगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी - येरवडा येथील पोलिस विभागाची जागा खाजगी विकसकाला विकसित करण्यासाठी दिली असून त्या संदर्भातील माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यानी अर्ज

नाकारला. अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत आपले म्हणणे ऐकूण घेण्यास इतर अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानी अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे नमूद करुन शुल्क कळविले. रु. १४००/- शुल्क भरले असून माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे ती रक्कम परत मिळावी.

जन माहिती अधिकारी - तक्रारकर्त्यांनी केलेला अर्ज महसूल शाखेकडून आमच्या कार्यालयाकडे आला. अर्जात संबंधित जागा अथवा प्रकरण या बाबतचा कोणताही तपशील दिलेला नसल्यामुळे कोणती कागदपत्रे हवी आहेत, याचा बोध होत नसल्याचे कळवून दि. १५/१०/२०१० चा अर्ज निकाली काढल्याचे दि.१९/१०/२०१० च्या पत्रान्वये कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान तक्रारकर्त्यांच्या प्रतिनिधींशी झ ालेल्या चर्चेनुसार तपशील कळविलेला असून संबंधित माहिती सामान्य प्रशासन विभागाकडील असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार तक्रारकर्त्यांच्या प्रतिनिधींना संबंधित संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली व शुल्क कळविले. त्यानी सुमारे ८०० कागदपत्रांच्या नकला मागितल्या असल्यामुळे रु. १६००/- इतके शुल्क कळविले. प्रत्यक्ष पानांच्या मोजणीनुसार रु. १४००/- शुल्क होत असल्यामुळे ते भरल्यानंतर माहिती दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तक्रारकर्त्यांनी नेमका तपशील न देता माहिती मागितली असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत दिलेले उत्तर योग्य आहे. अपिलाच्या दरम्यान माहितीबाबतचा नेमकेपणा स्पष्ट झाल्यावर ती देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केली असून त्यासाठी शुल्क आकारणे योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु. पो. निरा, ता. पुरंदर, जि. पुणे ४१२ १०२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (२), पुरंदर (सासवड) यांचे कार्यालय, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०२६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु. पो. निरा, ता. पुरंदर, जि. पुणे ४१२ १०२

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.आनंद कटके

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (२), पुरंदर (सासवड) यांचे कार्यालय,
जि. पुणे श्री. एस. एस. कुंभार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कर्जामधून बेकायदेशीर कपाती करण्यास दि.३१/५/२००५ च्या परिपत्रकान्वये सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी प्रतिबंध केला असून या परिपत्रकानुसार पुणे जिल्हयातील किती येथील नागरी पत संस्थांकडील संचालक मंडळांवर कारवाई करण्यात आली, याची माहिती दि.२४/८/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. ती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के यानी केली. परंतु दि. २७/८/२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हाच निर्णय कायम केला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (२), पुरंदर (सासवड) यांचे कार्यालय, जि. पुणे श्री. एस. एस. कुंभार यानी केले.

'कामकाजाचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला जाता',असा उल्लेख सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पुरंदर), सासवड, जि. पुरंदर यानी केलेला आहे, हे लक्षात घेता वरिष्ठ कार्यालयाकडून संपूर्ण जिल्हयाची माहिती मिळाली पाहिजे, असे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे.

सन २००५ पासून आजतागायत संपूर्ण जिल्हयाची एकत्रित स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या कार्यालयाकडे नसून तालुका स्तरावरील असल्याचे जन माहिती अधिकारी यानी उत्तरात नमूद केले आहे. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि कनिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या अहवालामध्ये अशा प्रकारची माहिती उपलब्ध असल्यास अपीलकर्त्यास देणे/अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देणे आवश्यक आहे. विस्तृत/सरसकट स्वरुपाची माहिती मागताना अपीलकर्त्यांनी अभिलेख अवलोकनाचा मार्ग अवलंबिणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ऋषीकेश अविनाश दरेकर
मु. पो. जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
जेजुरी नगरपरिषद, ता. पुरंदर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम विभाग प्रमुख,
नगरपरिषद जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कर विभाग प्रमुख,
नगरपरिषद जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२३/२०१०/दरेकर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/८/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ऋषीकेश अविनाश दरेकर
मु. पो. जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम विभाग प्रमुख,
नगरपरिषद जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे श्री. बाळु शिवराम खोमणे

**जन माहिती अधिकारी** तथा कर विभाग प्रमुख,
नगरपरिषद जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे श्रीमती रंजना किसन दुर्गाडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका गटातील रस्त्याबाबत माहिती मागितली असता दुसऱ्या गटातील रस्त्याची माहिती दिली. बेकायदेशीर कार्यवाही केली असल्याने योग्य माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी -अपीलकर्त्यांनी विचारणा केलेला रस्ता 'पालखी रस्ता' म्हणून ओळखला जातो. त्या बाबतची सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. एवढेच नव्हे, तर तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडून मोजणीही केलेली आहे.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यानी उपस्थित केलेले रस्त्याच्य जागेसंबंधातील अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास वसंतराव भागवत
शेवाळेवाडी, पो. मांजरी फार्म, ता. हवेली, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२
(अपील क्र. ५५०/२०१०/पुणे)

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे ४११ ००१ (अपील क्र. १७९७/२०१०/पुणे)

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२
(अपील क्र. ५५०/२०१०/पुणे)

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे ४११ ००१ (अपील क्र. १७९७/२०१०/पुणे)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९७/२०१०/पुणे + ५५०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ६/१/२०११ |

(अपील क्र. ५५०/२०१०/पुणे - फेर सुनावणी दि. १०/२/२०११)

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विलास वसंतराव भागवत
शेवाळेवाडी, पो. मांजरी फार्म, ता. हवेली, जि. पुणे
(अपील क्र. १७९७/२०१०/पुणे)

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,पुणे श्री. बाळासाहेब वानखेडे

| | |
|---|---|
| | (अपील क्र. १७९७/२०१०/पुणे)<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री. विकास शरद भालेराव<br>(अपील क्र. ५५०/२०१०/पुणे)<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवडणूक नायब तहसीलदार<br>श्री. अे. के. कणसकर (अपील क्र. ५५०/२०१०/पुणे)<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री. अनिल दत्तात्रय माने<br>(अपील क्र. १७९७/२०१०/पुणे) |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९३१ मध्ये आपल्या वडिलांनी खरेदी केलेल्या जमिनीबाबत फाळणी १२ व वाटपपत्र १९८४ मध्ये झाले. ७/१२ व ७/१२ वरील आणेवारीनुसार आमचा हिस्सा १/३ असताना फाळणीच्या व वाटपपत्राच्या वेळी मात्र १/४ हिस्सा देण्यात आला. त्यामुळे कमी क्षेत्र मिळाले. म्हणून सन १९८४ मधील फाळणी १२ च्या सोबतची कागदपत्रे मिळावीत. नकाशा तयार करताना झालेल्या चुकांमळे नुकसान झाले आहे. त्यात दुरुस्ती करण्यासाठी योग्य ती कार्यवाही केली जात नाही व संबधित संचिकाही अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत, अशी अपीलकर्ता श्री. विलास वसंतराव भागवत यांची तक्रार आहे.

अपील क्र. ५५०/२०१०/पुणे मधील माहिती मिळाल्याचे व तक्रार राहिली नसल्याचे लेखी निवेदन अपीकर्त्यांनी दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री. विकास शरद भालेराव यानी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले होते. परंतु हे निवेदन वेगळ्या अर्जाच्या संदर्भात होते व आयोगाने आदेश देऊनही संचिकांचा शोध न घेता आपली तक्रार नसल्याचे भासवले, मला माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यानी दि. २९/१०/२०१० च्या पत्रान्वये केली. त्याबाबत आयोगाने विचारणा केली असता ‘अपिलातील श्री. भागवत यांच्या अन्य अर्जासंदर्भातील पत्राचा उल्लेख करण्यात आला होता. परंतु ‘नजर चुकीने व

घाईघाईने मी त्या अर्जावर सही केली', असे श्री. भागवत यानी नमूद केले होते. मात्र याच अपिलातील अर्जाबाबत अपीलकर्त्यांनी त्यांचे स्पष्ट निवेदन दिले आहे', असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री. विकास शरद भालेराव यानी दि. १९/११/२०१० च्या पत्राने कळविले.

अपीलकर्ता उच्च विद्या विभूत असून तक्रार नसल्याच्या पत्रावर नजरचुकीने सही केल्याचे त्यांचे म्हणणे ग्राहय मानण्याजोगे नाही. तरीही आयोगाने दि. १०/२/२०११ रोजी अपील क्र. ५५०/२०१०/पुणे प्रकरणी फेर सुनावणी घेतली. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती भूमि अभिलेख विभागातील होती. आमच्या कार्यालयाकडील सर्व कागदपत्रे त्याना उपलब्ध करुन दिली. गुणाकार बुक व नकाशा आमच्या कार्यालयाकडे नसल्यामुळे त्याची नक्कल देणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री. विकास शरद भालेराव यानी नमूद केले. भूमि अभिलेख विभागातील माहिती उपलब्ध करुन देण्याचे आयोगाचे आदेश असल्याचे जन माहिती अधिकारी यानी भूमि अभिलेख विभागास अवगत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पाठपुरावा केला असल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवडणूक नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री. अे.के.कणसकर यानी दि. १४/२/२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

याच अनुषंगाने श्री. भागवत यानी केलेले अपील क्र. १७९७/२०१०/पुणे ची सुनावणी दि. ६/१/२०११ रोजी घेण्यात आली.

अभिलेख पहावयास मिळत नसल्यामुळे त्यांच्या नकलांसाठी अर्ज केला असता संचिका आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले, असे प्रतिप्रादन अपीलकर्ता श्री. विलास वसंतराव भागवत यानी केले.

आपल्याला कमी जमीन का मिळाली या विषयाची कायदेशीर माहिती द्यावी, असे अपीलकर्त्यांनी नमूद केले आहे. कायद्याच्या अन्वयार्थाच्या व स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची ही विचारणा असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास तसे कळविले. त्यानंतर आपल्याला हवे असलेले अभिलेख अपीलकर्त्यांनी स्पष्ट केले, त्यानुसार गुणाकार बुक व फाळणी नकला त्याना समक्ष देण्यात आल्या. मोजणीच्या संचिका त्यात शोध घेऊनही उपलब्ध नव्हत्या, त्या अन्य कार्यालयात होत्या. त्याही नंतर दाखविल्या. तसेच अर्जाप्रमाणे मागणी केलेली संपूर्ण माहिती/कागदपत्रे देण्यात आली आहेत. सन १९८४

मध्ये झालेली फाळणी मान्य नाही, अशी त्यांची मुख्य तक्रार असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. त्यासाठी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांचेकडे अपील करुन दाद मागून घ्यावी, असेही त्याना उप अधीक्षक, भूमी अभिलेख, हवेली यानी स्पष्ट केले होते, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री. विकास शरद भालेराव यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात संदिग्ध स्वरुपात व कायदेशीर अन्वयार्थात्मक स्वरुपाची विचारणा केली असून नंतरचा पत्रव्यवहार व अपिलांमध्ये स्पष्टीकरण देऊन तक्रार, माहिती/कागदपत्रांच्या नकला इ. मागणी केली. त्यानुसार त्याना प्रती देण्यात आल्या आहेत. क्षेत्र कमी लागल्याबाबतचा खुलासा हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येणारा भाग नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक पी. छाब्रिया
४१८, गणेश पेठ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.उपसंचालक,
भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, नवीन प्रशासकीय इमारत,
१ ला मजला,पुणे- १ (अपील क्र. २२०१/२०१०/पुणे)

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, नवीन प्रशासकीय इमारत,
१ ला मजला, पुणे- १ (अपील क्र. २२०१/२०१०/पुणे)

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, क्र. २,
९३१, शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी आवार,
खडकमाळ आळी, पुणे- २ (अपील क्र. २७०२/२०१०/पुणे)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०१/२०१०/पुणे + २७०२/२०१०+पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ + ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दिपक पी. छाब्रिया ४१८, गणेश पेठ, पुणे-२

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.उपसंचालक,
भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, नवीन प्रशासकीय इमारत,
१ ला मजला,पुणे श्री. अजय कुलकर्णी (अपील क्र. २२०१/२०१०/पुणे)

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, नवीन प्रशासकीय इमारत,
१ ला मजला, पुणे श्री. एस.एस.सावंत (अपील क्र. २२०१/२०१०/पुणे)

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,

| | |
|---|---|
| | उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, नवीन प्रशासकीय इमारत,<br>१ ला मजला, पुणे श्री. संग्राम सुंदरराव जोगदंड (अपील क्र. २२०१/२०१०/पुणे)<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, क्र. २,<br>९३१, शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी आवार,<br>खडकमाळ आळी, पुणे श्री.संग्राम सुंदरराव जोगदंड (अपील क्र. २७०२/२०१०/पुणे) |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यानी माझ्या मालकीची पुणे पेठ घोरपडीगाव येथील स.नं.३८/६/७अ/७ब/१ या मिळकतीच्या अनुषंगाने संदर्भीत प्रकरणातील १४ भू-खंडांच्या फेर मोजणीचे आदेश दिले होते. दोन वेळा मोजण्या झाल्या असून मो.र.नं. ७७/०४ व मो.र.नं. १०७४/०७ या मोजणीनुसार दोन्ही भूखंडामधील काही भाग सामाईक समाविष्ट असल्याचे दिसून येते. दोन स्वतंत्र भूखंड अशा प्रकारे एकत्र कसे असू शकतील, याचे उत्तर दिले जात नाही. तसेच जमीन नोंद व मोजणी यातील चुकांची दुरुस्ती का झाली नाही, याचा खुलासा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळत नाही. प्रत्यक्ष जमिनीवर सध्या माझा ताबा/वहिवाट नसल्याच्या कारणावरुन फेरमोजणी करुन दिली जात नाही. सर्व मिळकत धारकांचे मोजणी शुल्क मी स्वतः भरले आहे.

अपील क्र. २२०१/२०१०/पुणे

जन माहिती अधिकारी- नगर भू मापन अधिकारी श्री. चंद्रकांत शिंदे हे तत्कालीन जन माहिती अधिकारी होते. संबंधित प्रकरणी फेर चौकशीसाठी त्यांच्याकडे सुनावणी झाली होती व त्यानुसार माहिती अपीलकर्त्यास पुरविली.

अपिलीय प्राधिकारी- संबंधित प्रकरणी दिवाणी न्यायालयात दावा चालू आहे.

नगर भूमापन अधिकारी - अपीलकर्त्यांनी काही मुद्दयांबाबत खुलासा, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा केली होती. ती वगळता सर्व माहिती दिली. वहिवाट नसेल तर जमिनीची मोजणी करता येत नाही. न्यायालयाकडून मोजणी मागणे आवश्यक आहे.

अपील क्र. २७०२/२०१०/पुणे

जन माहिती अधिकारी- तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांची बदली झाली आहे. मो.र.नं.७७/०४ व मो.र.नं.१०७४/०७ या मोजणीबाबतची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून 'गोपनीय' म्हणून या धारिका जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांच्याकडे पाठविलेल्या आहेत. या दोन्हीही धारिकांमधील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यांकडे आहेत. संबंधित मिळकतीतील श्री. छाब्रिया यांच्यासह १४ जणांच्या खरेदीखतामध्ये चतु:सीमा नसल्यामुळे याबाबत काहीही कार्यवाही करता येत नाही. दिवाणी न्यायालयाने त्यांचा दावा फेटाळून लावला आहे. अपीलकर्त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रथम अपील केलेले नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे आक्षेप, मोजणीतील अपीलकर्त्यांच्या मते असलेल्या चुकांची व नोंदीमधील अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार दुरुस्ती करण्याची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे याच्या मात्र दि. १२/२/२००९ च्या आदेशामध्ये दि. २७/४/२००९ रोजीच्या आदेशान्वये दुरुस्ती करण्यात आली, ती कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमान्वये केली, याची नेमकी माहिती, तसेच दोन्ही वेळेच्या मोजणीबाबतच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. यानुसार माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अपीलकर्त्यास माहिती देऊन अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा प्र.उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,पुणे यानी दि. ३०.९.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.५.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. यशवंत ग. सरवदे
श्री. परशुराम म. गंगानोर
१२२ सावित्रिबाई फुले वसाहत, सिंहगड रोड, पुणे- ३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचनभवन, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचनभवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचनभवन, पुणे श्री. एस. पी. कुलकर्णी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे पाटबंधारे मंडळाच्या कक्षेतील दि. १/१/२००८ पासून दि.३०.६.२०१० या तारखेपर्यंतची विकास कामे, शासनाकडून प्राप्त झालेला निधी, अधीक्षक अभियंता श्री. अ.वा.सुर्वे यांचे मालमत्ता विवरणपत्र आदि माहिती मिळत नाही. अपिलीय प्राधिकारी यानी नियमानुसार विहित मुदतीत पहिली सुनावणी न घेता एकतर्फी निर्णय दिला. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी व संपुर्ण माहिती मिळावी, अशी

मागणी अपीलकर्ता श्री. यशवंत ग. सरवदे व श्री. परशुराम म. गंगानोर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यानी सरसकट व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. याबाबत मुदतवाढ मागणी पत्र त्याना विहित मुदतीत पाठविले. त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध ठेवण्यात आले व विहित मुदतीत त्याना ते अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले. त्यानुसार कोणती माहिती पाहिजे, याबाबत त्यांनी नंतर संपर्क साधला नाही. अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता न थांबल्यामुळे ते अनुपस्थित असल्याची नोंद करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचनभवन, पुणे श्री. एस. पी. कुलकर्णी यानी केले. याच स्वरुपाचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचनभवन, पुणे श्री. अविनाश व्ही. सुर्वे यानी दि. १५/४/२०११ च्या पत्रान्वये सादर केले.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती सरसकट व विस्तृत स्वरुपाची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. परंतु तसे न करता जन माहिती अधिकारी यानी अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिले असल्यामुळे हव्या असलेल्या नेमक्या कागदपत्रांच्या लेखी प्रतींची मागणी अपीलकर्त्यांनी करणे आवश्यक आहे. त्यानी तशी मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यानी योग्य ते शुल्क आकारुन माहिती पुरविली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप रामचंद्र इनामके
स.नं.५३९ बी, घोरपडे पेठ, इनामके मळा, पुणे-४११०४२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (विशेष), (भूमी आणि जिंदगी),
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, (भूमी आणि जिंदगी),
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप रामचंद्र इनामके
स.नं.५३९ बी, घोरपडे पेठ, इनामके मळा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (विशेष), (भूमी आणि जिंदगी),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, (भूमी आणि जिंदगी),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अभिजीत प्रल्हाद डोंबे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : घोरपडी पेठ, पुणे येथील मिळकतीबाबत नगररचना योजनेच्या कार्यवाहीसंबंधी महानगरपालिकेने लवादापुढे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य माहिती मागितली होती. परंतु ही माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी कळविले. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. आम्हाला/वहिवाटदारांना लवादापुढे न बोलाविताच जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही केली गेली असल्यामुळे मूळ मालकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने ही कागदपत्रे उपलब्ध होणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : सन १९८९ सालातील कार्यवाहीसंबंधीचा हा विषय आहे. तीन जागांवर आरक्षण करण्यात येऊन नगररचना योजनेच्या अंतिम आराखड्यानुसार या जागांवर मालक म्हणून पुणे महानगरपालिकेची नोंद करण्यात आली आहे. त्याबाबत अपीलकर्ता वारंवार माहितीच्या अधिकारात अर्ज करून विविध स्वरूपाची माहिती मागवीत असतात व आक्षेप नोंदवीत असतात. संबंधित माहिती आमच्याकडे उपलब्ध नसून शासनाकडे असण्याची शक्यता आहे. अपीलकर्त्यानी ती माहिती संबंधित विभागाकडून घेतली पाहिजे. आमच्याकडे उपलब्ध असलेली माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे.

अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या कक्षेतील नाही. तथापि संबंधित दस्तऐवज ज्या ज्या ठिकाणी असण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी पत्रव्यवहार करून अपीलकर्त्याना माहिती उपलब्धतेनुसार पुरविण्याचे आयोगाचे निदेश कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र त्यानुसार माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.१२.८.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. परंतु सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे यांच्याकडे यापूर्वीच पत्रव्यवहार करण्यात आला असून केवळ एक शक्यता म्हणून शासनाच्या महसूल व वनविभागाकडेही पत्रव्यवहार करण्यात आला आहे व त्याच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या आहेत, असा अहवाल उपआयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका श्री.सुधाकर देशमुख यानी दि.१२.९.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोविंद पंढरीनाथ जगताप
लुंबिनी, फ्लॅट नं.१८, बी विंग, योजना हौसिंग सोसायटी,
श्रावस्तीनगर, घोरपडी गाव, पुणे-४११००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरूर,
ता.शिरूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कारेगांव,
ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोविंद पंढरीनाथ जगताप
लुंबिनी, फ्लॅट नं.१८, बी विंग, योजना हौसिंग सोसायटी, श्रावस्तीनगर,
घोरपडी गाव, पुणे-४११००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरूर,
ता.शिरूर, जि.पुणे श्री.डी.एम.यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कारेगांव, ता.शिरूर, जि.पुणे
श्री.व्ही.के.सोनवणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आमच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण करून अन्य व्यक्ती बांधकाम करीत आहेत. ८-अ उताऱ्याला जमिनीचा तपशील असूनही अतिक्रमण करणाऱ्या आमच्या भावकीतील लोकांवर पोलीस, ग्रामपंचायत कोणीही कारवाई करीत नाही. जमीन आमच्या मालकीची असल्याचा पुरावा न्यायालयाने मागितला, परंतु ग्रामपंचायतीने गावाचा सिटी सर्व्हे झाला नसल्यामुळे नकाशा उपलब्ध नसल्याचे कारण देऊन माहिती दिली नाही.मालकीबाबत ग्रामपंचायतीला नेमकी खात्री नसल्यास बांधकाम कोणत्या मिळकतीत चालू आहे व त्याना कसा परवाना दिला, याचे उत्तर मिळाले पाहिजे. ते दिले जात नाही. ग्रामपंचायतीने जमिनीची मोजणी करून द्यावी व अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : कारेगावचा सिटी सर्व्हे झालेला नसल्यामुळे बांधकाम कोणत्या मालकीहक्काच्या मिळकत क्रमांकामध्ये चालू आहे, हे नकाशाअभावी सांगता येत नाही. मात्र बांधकामाला परवाना देण्यात आला आहे. हे बांधकाम अनधिकृत असल्याचे ग्रामपंचायतीला सिध्द करून दिल्यास ते पाडण्याचा ग्रामपंचायतीला अधिकार आहे. तसे अपीलकर्त्यांना स्पष्ट कळविले आहे.

ग्रामपंचायतीने जमिनीची मोजणी करून देण्याची व अतिक्रमणावर कारवाई करण्याची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र संबंधित व्यक्तीना कोणत्या कागदपत्रांच्या आधारे बांधकाम परवाना दिला त्याच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या जाणे आवश्यक आहे. दि.१५.११.२०१० रोजी अपीलकर्त्यांनी याच संदर्भात केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने चौकशी व योग्य कार्यवाही करण्याचे आदेश गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरूर यानी विस्तार अधिकारी याना दिले होते. त्यांच्या चौकशीच्या अहवालाची प्रतही सोबतच्या कागदपत्रांच्या प्रतींसह अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याची तक्रार असलेल्या बांधकामाला ग्रामपंचायतीने दिलेली परवानगी व त्यासोबतची कागदपत्रे व गटविकास अधिकाऱ्यानी दि.१५.११.२०१० च्या पत्रान्वये विस्तार अधिकारी याना दिलेल्या आदेशानुसार केलेल्या चौकशीचा अहवाल व सोबतची कागदपत्रे यांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे यानी अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवाव्यात व अनुपालन अहवाल दि.३०.९.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास रामचंद्र गंगावणे
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, बिल्डिंग नं.एल-३८, रूम नं.५५६,
येरवडा, नागपूर चाळच्या मागे, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय,
पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय,
पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९८४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय,
पुणे डॉ.अजय एस.चंदनवाले

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे
श्री.रमेश एन.जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सौ.शामा विलास गंगावणे (ऊर्फ शाम काळूराम निकाळजे, शिपाई) या ससून सर्वोपचार रूग्णालयात सन १९९५ मध्ये बदली कामगार असल्यापासूनचा त्यांचा पगार आदींविषयक माहिती

अपीलकर्ता श्री.विलास रामचंद्र गंगावणे यानी मागितली होती. सौ.गंगावणे यानी कौटुंबिक न्यायालयात दावा दाखल केला असून आपली वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये, असे त्यानी लेखी कळविल्यामुळे त्यांची वैयक्तिक माहिती वगळता पगार व इतर माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री.रमेश एन.जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे डॉ.अजय एस.चंदनवाले यानी पूरक कागदपत्रांसह केले.

शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याचे वेतन व त्याविषयीची माहिती गोपनीय अथवा व्यक्तिगत स्वरूपाची नाही, त्यामुळे ती देणे कर्मचाऱ्याच्या मर्जी/संमतीवर अवलंबून नाही. मात्र अपीलकर्त्यास ही माहिती देण्यात आली आहे. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गजानन भिकाजी कुंभार
सरस्वतीनगर, बर्फाचे कारखान्यासमोर इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर,
तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर,
तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गजानन भिकाजी कुंभार
सरस्वतीनगर, बर्फाचे कारखान्यासमोर इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे
श्री.नागेश प्र.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : अपील क्र.७२४ व अपील क्र.३१०७ मध्ये राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यानी पुरविलेली माहिती चुकीची आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून तहसीलदार कचेरीकडे पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जात नाही, तसेच चौकशी व पुढील योग्य कार्यवाही होत नाही.

अपिलीय प्राधिकारी : उपरोक्त अपिलांमध्ये अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश आयोगाने दिले असून अपीलकर्त्याना वेळोवेळी माहिती दिलेली आहे. संघटनेच्या माध्यमातून व्यक्तिगत कामासाठी दबाव आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ते दररोज कार्यालयात येतात. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. शासकीय जमीन मिळावी, अशी त्यांची मागणी असून त्याबाबतच्या कार्यवाहीची माहितीही त्याना दिली आहे. ते दररोज कार्यालयात येतात व विविध प्रकारचे अर्ज, पत्रव्यवहार सादर करून पोहोच घेतात.

अपीलकर्त्याना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यानी सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.नागेश प्र.पाटील यानी सादर केलेल्या अहवालात अपीलकर्त्याच्या शासकीय जमिनीच्या मागणीबाबतचा तपशील दिला असून त्यावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असल्याचे वेळोवेळी त्यानी मागितलेली माहिती पुरविण्यात आली असल्याचे त्यानी नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती त्याना देण्यात आली आहे. अर्जावर तहसीलदार कार्यालयात कार्यवाही होत नाही, आदींबाबतचे त्यांचे निवेदन हा प्रशासकीय कार्यवाहीविषयक आक्षेपांचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती-मागणीच्या अर्जावर व प्रथम अपिलावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.जी.गोरे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.नागेश प्र.पाटील याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३०.८.२०११**